# विचारसागरातील अनमोल मोती

.गो.काट

BVBK-0402976

बा-वा
२९८६
3/3/98

# कथासरित्सागरातील अनमोल मोती

## भाग तिसरा

निवेदक
मा. गो. काटकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
ना. क्र. २९८६ दिनांक 3/3/98
विषय बा.वा.

कौस्तुभ प्रकाशन
नागपूर २२

BVBK-0402976

**प्रकाशक :**
शैलेश देशपांडे,
कौस्तुभ प्रकाशन,
२९/अ, नवनिर्माण सोसायटी,
राणा प्रतापनगर,
**नागपूर २२**

**मुद्रक :**
प्रभाकर धाक्रस,
सूर्य ऑफसेट,
रामदास पेठ,
**नागपूर १०**

© **सर्वाधिकार :**
मा. गो. काटकर
सोलापूर

**नवीन आवृत्ती :**
१५ ऑगस्ट १९९३

**मूल्य :**
वीस रुपये

## *निवेदन*

*कुमार मित्रांनो!*

*पंडित सोमदेव हा विलक्षण प्रतिभाशाली कवी होता. त्याने बृहत्कथेतून कथा-सरित्सागरात घेतलेल्या साडेतीनशेहून जास्त छोट्या मोठ्या कथांची मोठी बहारदार व चित्ताकर्षक गुंफण केलेली आहे. मानवी स्वभावाची विविधता दाखविणाऱ्या या नाना प्रकारच्या निवडक कथांचे संकलन या संग्रहात केले आहे. या महान कथासागरातील मनोरंजक व उद्‌बोधक कथा तुम्हास नक्कीच आवडतील असा विश्वास वाटतो.*

**- मा. गो. काटकर**

## कथाक्रम

| | | |
|---|---|---|
| १) | साहसी शक्तिदेव | ३ |
| २) | रूपशिखेचे चातुर्य | २२ |
| ३) | विद्याप्राप्तीचा मार्ग | ३२ |
| ४) | दैवाने दिले, कर्माने नेले | ३४ |
| ५) | देवतारी त्याला कोण मारी | ३७ |
| ६) | वीरवराची स्वामिनिष्ठा | ४१ |
| ७) | रंकाचा राव असा झाला! | ४७ |
| ८) | गर्वाचे घर खाली | ५१ |

अ. प्र. ग्रं. ... शाखा.
इ. क्र. २६०८६ ... ३१/३/९०
विषय ८९१.४६

# साहसी शक्तिदेव

प्राचीन काळी आपल्या भारतात वर्धमान या नावाचे एक सुंदर शहर होते. तेथे परंतप नावाचा एक शूर राजा राज्य करीत होता. त्याच्या पट्टराणीचे नाव कनकप्रभा असे होते. राजा परंतप प्रजाहिततत्पर असल्यामुळे त्याची प्रजा सुखी होती. कनकप्रभेला एक सुंदर मुलगी झाली. ती आपल्या आई सारखीच गौरवर्णाची असल्यामुळे तिजे नाव कनकरेखा असे ठेवले गेले. राजाने आचार्यांकडून विद्याभ्यासात व नाना कलात तिची प्रगती करून घेतली.

कनकरेखा उपवर झाली तेव्हा एखादा अनुरूप वर पाहून तिचे लग्न करावे असे राजाला वाटू लागले. एके दिवशी तो कनकप्रभेला म्हणाला, "देवी, आपल्या कनकरेखेला योग्य असा वर कसा व कोठे मिळेल याची मला चिंता वाटते!" तेव्हा कनकप्रभा राणी हसून म्हणाली, "प्राणनाथ, कनकरेखेला लग्न करण्याची इच्छाच नाही. मी लग्नाबद्दल तिला विचारले. तेव्हा ती म्हणाली, 'आई, मला नाही लग्न करायचं! मी जिवंत राहावं अशी जर तुमची इच्छा असेल, तर पुन्हा माझ्याकडं लग्नाचा प्रश्नच काढू नकोस.' मी तिची समजूत काढण्याचा खूप प्रयत्न केला पण तिने त्याकडे दुर्लक्ष केले. मोठी हटवादी मुलगी आहे ती! तिचं बोलणं ऐकून मी तर फार कष्टी झाले आहे. असं असताना आपण तिच्यासाठी योग्य वराची चिंता का करता?"

आपल्या राणीचे असे चकित करणारे शब्द ऐकून गोंधळलेला राजा त्वरेने आपल्या कन्येच्या अंतःपुरात गेला आणि तिला म्हणाला, "मुली, देवकन्या व दैतकन्या प्रसंगी तप करून सुद्धा ज्याची मागणी करतात तो वर, व विवाह तू नको का म्हणतेस?" असे आपल्या पित्याचे बोलणे ऐकून कनकरेखा खाली मान घालून म्हणाली, "बाबा, सध्या मला लग्न करावं असं वाटत नाही. त्याबद्दल तुमचा आग्रह नसावा. त्याचं कारण म्हणजे माझा एक पण आहे. तुम्हाला माझं लग्नच करायचं असेल तर ज्या कोणी ब्राह्मणानं किंवा क्षत्रियानं कनकपुरी नावाची नगरी पाहिली असेल, त्याच्याशीच मी लग्न करीन, तोच माझा पती होईल!"

असे कनकरेखेचे शब्द ऐकून राजाला थोडे समाधान वाटले. कारण आपला पण सांगून का होईना ती लग्नास तयार झाली, म्हणून त्याला व कनकप्रभेला आनंद झाला. दुसऱ्या दिवशी राजसभेत राजाने घोषणा केली, 'ज्या कोणी कनकपुरी पाहिली असेल त्याला मी माझी कन्या कनकरेखा आणि युवराजपद देणार आहे.' पण राजसभेतील कोणीही माणसाने कनकपुरीचे नाव ऐकले नव्हते, तर ती पहाण्याची गोष्ट दूरच. मग राजाने आपल्या घोषणेप्रमाणे सर्व राज्यात डांगोरा पिटण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे नगरातील चौकाचौकात राजाज्ञेचा डांगोरा पिटत राहिला. पण कनकपुरी पाहिलेला कोणीही ब्राह्मण किंवा क्षत्रिय तरुण राजाला भेटला नाही.

त्या राज्यात शक्तिदेव नावाचा एक ब्राह्मणपुत्र होता. लहानपणीच कुसंगतीमुळे त्याने जुगारात बराचसा पैसा घालवला. तेव्हा अशा व्यसनी मुलाला घरात ठेऊन काय उपयोग, म्हणून त्याच्या वडिलांनी त्याला घराबाहेर काढले होते. शक्तिदेव धीट व चतुर होता. फार उशीरा का होईना त्याला पैशाची व स्वतःची किंमत कळली. आता योग्य मार्गाने वाटचाल करून आपला दुर्लौकिक नाहीसा करावा, असे त्याला वाटू लागले. त्याच वेळी राजाची घोषणा त्याच्या कानी पडली. तेव्हा तो स्वतःशी म्हणाला, 'घरातून हाकलून दिल्यामुळे आपण कफल्लक. कोणी आश्रय देण्यास तयार नाही. तेव्हा आता आपण थेट राजाकडं जावं आणि मी कनकपुरी पाहिली आहे, असं खोटचं त्याला सांगांव. कनकपुरी कोणीही पाहिली नाही हे तर घोषणेवरून स्पष्टच होतं. राजाला आपलं खोटं बोलणं खरं वाटलं तर राजकन्या व युवराजपद या दोन्ही गोष्टी आपल्यालाच मिळतील. मग काय! सगळा आनंदी आनंदच!' असा विचार करून शक्तिदेव मोठ्या धीटपणे थेट राजवाड्यात गेला.

राजद्वारात पोहोचताच एका राजसेवकाने शक्तिदेवाला राजाकडे नेले. "तू कनकपुरी पाहिली आहेस का ?" असा राजाने त्याला प्रश्न केला, तेव्हा 'होय महाराज मी कनकपुरी पाहिली आहे,' असे शक्तिदेवाने ठासून सांगितले. सुंदर व चलाख शक्तिदेवाच्या बोलण्यावर राजाचा विश्वास बसला. पण खात्री करून घेण्यासाठी त्याने शक्तिदेवाला आपल्या सेवकाबरोबर कनकरेखेच्या महालात प्रवेश केला. तेव्हा तिने त्याला आसनस्थ होण्याची विनंती करून विचारले " खरंच, आपण कनकपुरी पाहिली आहे का ?" " होय, होय, पाहिली आहे तर," शक्तिदेव ठासून म्हणाला, " मी विद्यार्थीदशेत

पृथ्वीपर्यटन करीत असताना ती सुंदर नगरी पाहिली आहे." "अस्सं!" कनकरेखा आश्चर्याने उद्गारली, " आपण कोणत्या मार्गाने त्या नगरीला गेलात ? कशी काय आहे हो, ती नगरी ?"

कनकरेखेच्या या प्रश्नांनी शक्तिदेव क्षणभर गोंधळला पण तसे न दाखवता तो शांतपणे म्हणाला, "प्रथम मी हरपूर नावाच्या नगरात गेलो. तेथून प्रवास करीत वाराणसी गाठली. तेथून काही दिवसांनी पौंड्रवर्धन नगरात गेलो. तिथून सरळ कनकपुरीस गेलो. काय सुंदर नगरी आहे ती ! तशी नगरी मी आत्तापर्यंत कुठंच पाहिली नाही. साक्षात इंद्राच्या अमरावतीसारखी आहे ती. त्या सुंदर नगरीत मी काही दिवस विद्याभ्यासाठी राहिलो. नंतर काही दिवसांनी पुन्हा येथे परत आलो."

लबाड शक्तिदेवाची लबाडी चाणाक्ष कनकरेखेच्या लक्षात आली; पण पुन्हा तिने त्याला विचारले, "आपण ती सुंदर नगरी पाहिली, असं वाटतं खरं ! त्या नगरीचा मार्ग पुन्हा आपण सांगाल का ?" तेव्हा अत्यंत आनंदित होऊन शक्तिदेव पुन्हा तोच मार्ग सांगू लागला. त्याची लबाडी व खोटे बोलण्याची धिटाई पाहून कनकरेखेला त्याचा राग आला. आणि तिने आपल्या दासीकडून त्याला हाकलून दिले.

नंतर कनकरेखा तडक आपल्या वडिलांकडे गेली आणि त्यांना म्हणाली, "बाबा, त्या माणसाची परीक्षा करण्यात तुम्ही चुकलात. त्या ठगानं तुम्हाला चांगलंच ठकवलं. धूर्त माणूस सरळ स्वभावाच्या माणसाला असंच नेहमी ठकवीत असतो. माझ्याहीपुढे तो धीटपणे खोटं खोटं सांगत होता. पण अखेर मी त्याला दासीकडून हाकलून दिलं." कनकरेखेचे शब्द ऐकून राजा प्रथम कष्टी झाला. पण आपली कन्या मोठ्या संकटातून वाचल्यामुळे त्याला समाधानही वाटले. कनकरेखेने लग्नाबाबत सम्मती दिली, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेर राजाने आपल्या राज्यात आपल्या घोषणेचा डांगोरा नेहमी पिटत ठेवण्याची आज्ञा दिली.

शक्तिदेवाला कनकरेखेने हाकलून दिल्यामुळे तो मोठा अपमानित झाला होता. त्यामुळे अत्यंत खिन्न होऊन तो स्वतःशी म्हणाला, "मी कनकपुरी पाहिली नसताना ती पाहिली असं खोटंच राजकन्येला सांगितलं, त्यामुळेच आपल्यावर कष्टी होण्याचा प्रसंग आला. किती सुंदर आहे कनकरेखा ! पण

कनकपुरी पाहिल्याशिवाय ती मला प्राप्त होणार नाही. तेव्हा कनकपुरीचा शोध घेण्यासाठी सर्व पृथ्वी पालथी घालायची !" असा विचार करून कनकरेखेला प्राप्त करून घेईन नाहीतर प्राण देईन अशी त्याने प्रतिज्ञा केली. त्याप्रमाणे तो कनकपुरीच्या शोधासाठी वर्धमान नगराच्या दक्षिण दिशेने प्रवासाला निघाला.

बिचारा शक्तिदेव पायीच प्रवास करीत करीत अखेर विंध्यारण्यात प्रवेशला. मार्गात खाण्यापिण्याच्या खूप हालअपेष्टा सहन करीत पुढे पुढे जात असताना एका निर्जन प्रदेशात त्याला एक मोठे सुंदर सरोवर दिसले. त्याचे पाणी थंड व मधुर होते. त्याच्या दर्शनाने शक्तिदेव आनंदित झाला. त्या सरोवराजवळ शक्तिदेवाला एक आश्रम दिसला म्हणून तो तेथे गेला. तेव्हा समोरच एका मोठ्या पिंपळाच्या झाडाखाली आपल्या अनेक शिष्यांसह बसलेला एक वृद्ध मुनी त्याच्या दृष्टीस पडला. त्या मुनीचे नाव सूर्यतप असे होते.

शक्तिदेवाने सूर्यतप मुनीजवळ जाऊन त्यांना वंदन केले. तेव्हा मुनीने त्याचे स्वागत करून त्याला विचारले, "भल्या माणसा, तू कोठून आलास ? तू कोठे चालला आहेस ?" असा मुनीचा प्रश्न ऐकून शक्तिदेव म्हणाला, "आचार्य, कनकपुरीच्या शोधार्थ मी वर्धमान नगराहून निघालो. ती नगरी कोठे आहे, ते कृपा करून मला सांगा." अशी शक्तिदेवाची विनंती ऐकून स्मित करीत सूर्यतप मुनी म्हणाले, " वत्सा, आठशे वर्ष मी या आश्रमात आहे. पण आतापर्यंत त्या नगरीचं नाव मी कधीही ऐकलं नाही." असे मुनींचे शब्द ऐकून शक्तिदेव अतिशय खिन्न व निराश झाला. आणि म्हणाला, "तर मग मी जिवंत राहात नाही, असं समजायला हरकत नाही." शक्तिदेवाचे असे दुःखीकष्टी शब्द ऐकून मुनींना त्याची दया आली. ते त्याला म्हणाले, "असाच जर तुझा निश्चय असेल तर मी सांगतो तसं कर. येथून तीन योजने अंतरावर कांपिल्य नावाचा देश आहे. तेथे उत्तर नावाचा पर्वत आहे त्या पर्वतावरील एका आश्रमात दीर्घतप नावाचा माझा वडीलभाऊ राहातो. तू त्याच्याकडे जा. तो माझ्यापेक्षा जास्त वृद्ध असल्यामुळं कदाचित त्याला ती नगरी माहीत असेल."

असे मुनींचे शब्द ऐकून शक्तिदेवाला थोडे समाधान वाटले. ती रात्र आश्रमात घालवून दुसऱ्या दिवशी सकाळी तो तेथून पुढील प्रवासासाठी निघाला. मार्गात अनंत संकटांना तोंड देत अखेर शक्तिदेव कांपिल्य देशात

येऊन पोहोचला. नंतर तो उत्तर पर्वतावरील दीर्घतप मुनींच्या आश्रमात गेला. मोठ्या भक्तिभावाने मुनींना वंदन करून तो म्हणाला, "आचार्य, आपले बंधू सूर्यतप मुनींनी मला आपणाकडं पाठवलं आहे. कनकपुरी कोठे आहे, ते कृपा करून मला सांगा." असे शक्तिदेवाचे शब्द ऐकून मुनी त्याला म्हणाले, "बाळा, मी तुझ्याच तोंडून प्रथम कनकपुरीचे नाव आज ऐकत आहे. मला वाटतं, ती नगरी दूरच्या एखाद्या द्वीपावर असावी. तेव्हा मी सांगतो तसं कर म्हणजे कदाचित तुला तिचा शोध लागेल. समुद्रात उत्स्थल नावाचं एक द्वीप आहे. तिथं सत्यव्रत नावाचा एक श्रीमंत कोळयांचा राजा राहातो. त्याचं नेहमी दुसऱ्या द्वीपाला जाणं येणं असतं, त्यामुळं कदाचित त्यानं ती नगरी पाहिली असेल. किंवा तिच्याविषयी काही ऐकलं असेल, यास्तव तू आता समुद्रकाठी असलेल्या विटंकपुरास जा. तेथून नौकेने तू त्या द्वीपात जा. त्यासाठी एखाद्या व्यापाऱ्याशी तू मैत्री कर म्हणजे झालं!"

असे मुनींचे शब्द ऐकून शक्तिदेवाने 'बरं आहे' असे म्हणून त्यांचा निरोप घेतला. निश्चयी शक्तिदेव पुन्हा अनेक हालअपेष्टा सोशीत, अनेक देश ओलांडून अखेर समुद्रकाठावरील विटंकपुरास गेला. तेथे गेल्यावर प्रथम त्याने कोण व्यापारी उत्स्थल द्वीपाला जाणार आहे त्याची चौकशी केली. तेव्हा समुद्रदत्त नावाचा एक व्यापारी तिकडे जाणार असल्याने कळताच शक्तिदेवाचा समुद्रदत्ताबरोबर उत्स्थल द्वीपाकडे जलप्रवास सुरू झाला.

काही दिवस त्यांचा जलप्रवास सुखाचा झाला. शक्तिदेवाची हकीकत ऐकून समुद्रदत्त आपल्याला एक चांगला पराक्रमी व धाडसी मित्र मिळाला म्हणून स्वतःला धन्य मानू लागला. आता उत्स्थलद्वीप दोन दिवसांच्या अंतरावर राहिले होते. एके दिवशी संध्याकाळी एकाएकी आकाश मेघांनी भरून गेले. वादळास सुरवात झाली. सोसाट्याचा वारा सुटला. मेघांचा गडगडाट व विजांचा कडकडाट होऊ लागला. समुद्र खवळला. चहूकडून मोठमोठ्या लाटा उसळू लागल्या. तेव्हा समुद्रदत्ताची नौका जबरदस्त हेलकावे खात लाटांबरोबर खालीवर होऊ लागली. तिला ताब्यात ठेवण्याचा कर्णधार आटोकाट प्रयत्न करीत होता. त्या भयंकर आपत्तीने नौकेवर हलकल्लोळ उडाला.

शक्तिदेवाला जलप्रवासचा असा अनुभव कधीच आला नव्हता. तोही फार चिंताग्रस्त झाला होता, तेवढ्यात ती नौका एका मोठ्या लाटेच्या

तडाख्याने समुद्रातून वर आलेल्या एका खडकावर आदळली. आणि तिचे तुकडे तुकडे झाले. सुदैवाने समुद्रदत्ताने नौकेच्या एका फुटक्या फळीचा आधार घेतला. बिचारा तीन दिवस समुद्रात तरंगत राहिला. चौथ्या दिवशी तो एका नौकेतील खलाशाच्या नजरेस पडला तेव्हा त्यांनी त्याला आपल्या नौकेवर उचलून घेतले. समुद्रदत्ताचे प्राण दैवयोगाने वाचले. पण शक्तिदेवाचे काय झाले ?

नौकेचे तुकडे तुकडे झाले तेव्हा शक्तिदेव समुद्रात फेकला गेला. त्या वेळी एक भला मोठा मासा आपले विवरासारखे भले मोठे तोंड उघडून बसला होता. शक्तिदेव तोंडात येताच त्याने त्याला गिळून टाकले. दैवयोगाने तो भला मोठा मासा समुद्रात संचार करीत असता उत्स्थल द्वीपाकडे गेला. तेथे मासेमारीसाठी आलेल्या सत्यव्रताच्या सेवकांनी तो प्रचंड मासा पाहाताच त्याला पकडून आपल्या धन्याकडे नेले. तो अजस्त्र मासा पाहून सत्यव्रतही आश्चर्याने थक्क झाला. तशा प्रकारचा मासा तो प्रथमच पाहात होता. नंतर त्याने आपल्या सेवकांना तो भयंकर मासा उभा कापण्याची आज्ञा केली. ते तसे करू लागताच ईश्वरकृपेने जिवंत राहिलेला शक्तिदेव माशाच्या पोटातून बाहेर पडला. पण तो बेशुद्धावस्थेतच होता. माशाच्या पोटातून जिवंत माणूस निघालेला पाहून सर्वांना खूप आश्चर्य वाटले.

सत्यव्रताने केलेल्या उपायांनी शक्तिदेव थोड्याच वेळात शुद्धीवर आला. तेव्हा सत्यव्रताने त्याला विचारले, "महाराज, आपण कोण ? या अजस्त्र माशाच्या पोटात आपण कसे शिरला ?" तेव्हा शक्तिदेव त्याला म्हणाला, "भल्या माणसा, मी शक्तिदेव नावाचा ब्राह्मण आहे. कनकपुरी नगरीस जाण्याकरिता मी वर्धमान नगराहून निघालोय. पण ती नगरी कुठाय ते ठाऊक नसल्यानं कितीतरी दिवस मी सर्वत्र भटकत आहे. उत्स्थल द्वीपातील सत्यव्रत नावाच्या कोळ्यांच्या राजाकडे कदाचित तुला कनकपुरीचा पत्ता लागेल असं दीर्घतप नावाच्या मुनींनी मला सांगितलं त्याप्रमाणे मी जलप्रवास करताना वादळानं नौका फुटली. तेव्हा या प्रचंड माशाने मला गिळलं. माझ्या आयुष्याची दोरी बळकट म्हणूनच त्या भयंकर आपत्तीतून मी जिवंत राहिलो !"

असे कष्टी झालेल्या शक्तिदेवाचे शब्द ऐकून सत्यव्रत म्हणाला, "शक्तिदेवा, मीच कोळ्यांचा राजा सत्यव्रत आहे. आणि हेच उत्स्थल द्वीप.

मी पुष्कळ द्वीपे आजपर्यंत पाहिली आहेत. पण कनकपुरी नगरीचे नाव माझ्या कधीही कानी पडलेले नाही." असे सत्यव्रताचे बोलणे ऐकून शक्तिदेव अतिशय खिन्न व निराश झाला. त्याला वाटले, आतापर्यंत आपण भोगलेल्या हालअपेष्ठा व प्राणघातक संकटे व्यर्थच झाली. त्याची कष्टी मुद्रा पाहून दयाळू सत्यव्रत त्याला म्हणाला, " महाराज, असे कष्टी होऊ नका. आजची रात्र येथे विश्रांती घ्या. उद्या सकाळपर्यंत मला कनकपुरीविषयी काही उपाय सुचेल." असे म्हणून सत्यव्रताने शक्तिदेवाला त्याची जेवणाखाण्याची व राहाण्याची चांगली व्यवस्था व्हावी म्हणून विष्णुदत्त नावाच्या एका ब्राह्मणाच्या घरी पाठवले.

विष्णूदत्ताने शक्तिदेवाचे चांगले आदरतिथ्य केले. नंतर विष्णुदत्ताने विचारल्यावरून शक्तिदेवाने त्याला आपले नाव, गाव, देश व आपल्या प्रवासाची हकीकत ही सर्व सांगितली. ती ऐकताच विष्णुदत्ताला एवढा आनंद झाला; की तो त्याला कडकडून भेटला. त्याचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. गहिवरलेल्या स्वरात तो म्हणाला, "शक्तिदेवा, तू माझा मामेभाऊ आहेस. मी लहानपणीच आपला देश सोडून तेथे आलो. इथं नाना देशातून प्रवासी येतात. त्यांच्याकडून तुझं कार्य होईल. तू काही काळजी करू नकोस. आता इथंच माझ्याजवळ तू आनंदात राहा!"

असे विष्णुदत्ताचे बोलणे ऐकून शक्तिदेवाला फार आनंद झाला. कारण परदेशात आप्तांची भेट होणे हे माळरानावर अमृताचा झरा सापडण्यासारखे आहे. आपली इच्छा लवकरच पूर्ण होणार असे त्यास वाटू लागले कारण मध्येच अकस्मात झालेले कल्याण पुढील कार्यसिद्धी सुचवित असते. नंतर रात्री विष्णुदत्त व शक्तिदेव गप्पागोष्टी करीत बोलत बसले व बऱ्याच वेळाने झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी कोळ्यांचा राजा सत्यव्रत विष्णुदत्ताकडे असलेल्या शक्तिदेवाला म्हणाला,"महाराज, कनकपुरीच्या शोधासंबंधी मला एक उपाय सुचला आहे. तो तुम्हाला सांगतो. समुद्राच्या मध्यभागी एक उत्तम रत्नकूट नावाचे चांगले द्वीप आहे. ते भगवान नारायणाचे निवासस्थान आहे. तिथे शुद्ध द्वादशीस मोठी यात्रा भरते. त्या यात्रेला दूरदूरच्या द्वीपातून अनेक भक्त येतात. त्यापैकी कोणाकडून तरी आपणास खात्रीने कनकपुरीचा

ठावठिकाणा समजेल, तेव्हा आता आपण त्या द्वीपाकडे जाण्यास निघू या. कारण यात्रेची तिथी अगदी जवळ आली आहे.'' तेव्हा शक्तिदेवाने त्याला आपली सम्मती दिली. नंतर विष्णुदत्ताने मायेने दिलेले फराळाचे पदार्थ बरोबर घेऊन शक्तिदेव सत्यव्रताबरोबर होडीतून रत्नद्वीपाकडे निघाला.

होडीचे सुकाणू सत्यव्रताच्या हाती होते. आणि शक्तिदेव होडी वल्हवीत होता. रत्नद्वीपाच्या दिशेने बरेच दूर गेल्यावर शक्तिदेवाला पंख असलेल्या पर्वतासारखे काहीतरी समुद्रातून वर आलेले दिसले. तेव्हा आश्चर्य वाटून त्याबद्दल त्याने सत्यव्रताला विचारले असता, सत्यव्रत म्हणाला, ''महाराज, तो पर्वत नसून ते एक फार जुने आणि फार मोठे वडाचे झाड आहे. त्याच्या बुंध्याजवळ वडवामुख या नावाचा एक फार मोठा भोवरा आहे. नावाडी त्याच्या आसपास मुळीच फिरकत नाहीत. कारण एकदा का नाव त्या भोवऱ्यात सापडली की त्यातून ती बाहेर निघत नाही!''

सत्यव्रत असे सांगत आहे तोच वाऱ्याच्या प्रचंड झोताने त्यांची होडी त्या भोवऱ्याकडे वेगाने निघाली. सत्यव्रताने वळविण्याचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ! तेव्हा ते दोघेही घाबरून गेले. दुर्दैवाने अजूनही शक्तिदेवाची पाठ सोडली नव्हती. परोपकारी सत्यव्रता शक्तिदेवाला धीर देत म्हणाला, ''आता आपण मृत्युमुखी पडणार हे निश्चित. प्रत्येक गोष्ट कर्माप्रमाणे होत असते. माझ्या मृत्यूबद्दल मला मुळीच वाईट वाटणार नाही, पण एवढी संकटे भोगून व अपार कष्ट सोसून तुमची इच्छा अपूर्णच राहिली याबद्दल मला मोठे दुःख होते. आता मी सांगतो तसे करा. मी या होडीची गती कमी करतो. तेवढ्यात वडाच्या फांदीला धरून तुम्ही झाडावर चढून जा. सुदैव अनुकूल असल्यास तुम्हाला त्यातूनही एखादा सुटकेचा मार्ग सापडेल. कारण समुद्राच्या तरंगाप्रमाणे दैवगती अतर्क्य आहे!''

आता शक्तिदेवाला एकही शब्द बोलण्यास अवसर नव्हता. होडीची गती मंद होताच त्याने उडी मारून वडाची एक फांदी आपल्या दोन्ही हातांनी घट्ट धरली. त्याच क्षणी धैर्यशाली सत्यव्रताची होडी भोवऱ्यात शिरून गरगर फिरू लागली. आणि दुसऱ्याच क्षणी वडवामुखात दिसेनाशी झाली. ते पाहून शक्तिदेव अतिशय दुःखी झाला. तो स्वतःशी म्हणाला, ''किती अभागी मी! कनकपुरी माझ्या नजरेस पडली नाहीच. पण माझ्याकरिता त्या परोपकारी

सत्यव्रताला मात्र आपले प्राण गमवावे लागले. भवितव्यतेचे उल्लंघन कोण करणार !''

वडाच्या फांदीचा दृढ आधार घेऊन शक्तिदेव दिवसभर उपाशीच राहिला. आता पुढे काय करावे हा एकच विचार त्याच्या मनांत घोळू लागला. अखेर दिवस मावळला. त्यावेळी अकस्मात चहूकडून पंख फडफडण्याचा मोठा आवाच आपल्याच दिशेने येत असलेला त्याच्या कानी पडला. त्याने पाहिले, चहूकडून प्रचंड गिधाडे वडाच्या झाडाकडे रात्रीच्या निवाऱ्यासाठी येत होती. त्या गिधाडांना पाहून घाबरलेला शक्तिदेव वडाच्या पानांनी आपले सर्व अंग झाकून घेऊन फांदीवर निमूटपणे पडून राहिला.

ती प्रचंड गिधाडे झाडावर येऊन स्वस्थपणे बसली. आणि काय आश्चर्य! ती एकमेकास दिवसभर पाहिलेल्या नवलाच्या गोष्टी मनुष्यवाणीने सांगू लागली. तेव्हा चकित झालेला शक्तिदेव कान टवकारून त्यांचे बोलणे ऐकू लागला. एक फार मोठे व म्हातारे गिधाड आपल्या मित्रांना म्हणाले, ''मित्रांनो, मी आज कनकपुरी पाहण्यास गेलो होतो. आणि उद्या देखील मी त्या नगरीतच मोठ्या आनंदाने विहार करण्यास जाणार आहे.'' गिधाडाच्या तोंडून कनकपुरीचे नाव ऐकताच शक्तिदेवाला आपले जीवन धन्य झाल्यासारखे वाटले. आतापर्यंत आपण भोगलेल्या हालअपेष्टांचे सार्थक झाले. कनकपुरी या नावाची खरीच एक नगरी आहे हे कळताच त्याला फार समाधान वाटले. पण त्याच्या पुढे आणखी एक अडचण दत्त म्हणून उभी राहिली. आता त्या नगरीत जायचे कसे ?

शक्तिदेवाने बराच वेळ विचार केला. त्याला एक युक्ति सुचली. थोड्याच वेळात सर्व गिधाडे झोपी गेली. तेव्हा फांदीवरून हळूच सरकत शक्तिदेव त्या वृद्ध गिधाडाजवळ गेला आणि हलकेच त्याच्या पाठीवर जाऊन त्याच्या अजस्त्र पंखात दडून बसला. सकाळ झाल्यावर सर्व गिधाडे चारी दिशांना उडून गेली. फक्त म्हातारे गिधाड मात्र शक्तिदेवासह कनकपुरीकडे वेगाने निघाले. त्या गिधाडाचे सामर्थ्य व वेग पाहून शक्तिदेवाला फार आश्चर्य वाटले. थोड्या वेळाने ते गिधाड कनकपुरीजवळ असलेल्या एका रम्य उद्यानात जाऊन उतरले. लगेच शक्तिदेव त्याच्या पंखातून हलकेच बाहेर पडला, आणि पाय न वाजवता त्या रम्य उद्यानात शिरला. अखेर आपण महत्प्रयासाने



कनकपुरीत आलो, याबद्दल शक्तिदेवाला किती आनंद झाला असेल याची कल्पना करावी तेवढी थोडीच !

त्या रम्य उपवनाची शोभा पाहात फिरत असताना शक्तिदेवाला एका लताकुंजाजवळ फुले खुडत असलेल्या दोन सुंदर स्त्रिया दिसल्या. त्याच वेळी त्यांचीही दृष्टी शक्तिदेवाकडे जाताच त्या विस्मित होऊन त्याच्याकडे बघतच राहिल्या. दिव्य नगरीतील या उपवनात माणूस कोठून आला या गोष्टीचे त्यांना आश्चर्य वाटले असावे, असे जाणून शक्तिदेव त्यांना म्हणाला, "अहो, या नगरीचं नाव काय आणि तुम्ही कोण आहात ?" तेव्हा त्या स्त्रिया म्हणाल्या, "महाराज, या नगरीचं नाव कनकपुरी आहे. इथं सर्व विद्याधर राहतात. चंद्रप्रभा नावाची विद्याधरी या नगरीची राणी आहे. हे उपवन तिचेच आहे. आम्ही तिच्या दासी, तिच्यासाठीच फुले घेऊन जाण्याकरिता इथं आलो आहोत." "अस्सं, मग छानच झालं !" शक्तिदेव आनंदून म्हणाला, "माझी एक विनंती आहे. मला तुमच्या राणीच्या भेटीस न्याल का ?" " हो, चला की !" असे म्हणून त्यांनी शक्तिदेवाला आपल्याबरोबर नगरीत नेले.

राजवाड्यात पाऊल टाकताच शक्तिदेव आश्चर्याने स्तंभित झाला. राजवाड्याच्या भिंती सोन्याच्या पत्र्यांनी मढविलेल्या होत्या. खांब नानाप्रकारच्या अमूल्य रत्नांनी जडविलेले होते. चहूकडे जांभळे, मखमली गालिचे पसरलेले होते. डोळे दिपवून टाकणाऱ्या त्या प्रसन्न ऐश्वर्याकडे शक्तिदेव टक्टक् बघतच राहिला. चंद्रप्रभेच्या दासींनी त्याला थेट चंद्रप्रभेच्या महालात नेले. तिथे चंद्रप्रभा एका रत्नजडित मंचकावर बसली होती. तिने शक्तिदेवाचे मोठ्या आनंदाने स्वागत केले. एका रत्नजडित आसनावर तो बसल्यावर चंद्रप्रभेने त्याला विचारले, "महाराज आपण कोण ? आणि मनुष्यास अगम्य व दुर्गम अशा या विद्याधर नगरीत आपण कसे आलात ?"

असे त्या लावण्यवती चंद्रप्रभेचे शब्द ऐकून शक्तिदेवाने राजकन्या कनकरेखेचा पण, व तो जिंकण्याच्या हेतूने आपण कनकपुरीच्या शोधार्थ केलेल्या साहसी प्रवासाची सगळी हकीकत तिला सांगितली. ती हकीकत लक्षपूर्वक ऐकल्यावर चंद्रप्रभा थोडा वेळ विचारमग्न झाली. नंतर एक दीर्ग उसासा सोडून ती म्हणाली, "महाराज, आता मी काय सांगते ते ऐका. माझे वडील शशिखंड हे या विद्याधर नगरीचे राजे. त्यांना आम्ही चौघी मुली. सर्वात थोरली मी. दुसरी चंद्ररेखा, तिसरी शशिरेखा व चवथी शशिप्रभा. एकदा माझ्या तिघी बहिणी गंगेत स्नानासाठी गेल्या. तिथं त्यांनी स्नान करीत असलेल्या अग्नितप नावाच्या मुनीच्या अंगावर पाणी उडविले तेव्हा रागावून त्या मुनीनं, 'दुष्ट मुलींनो, मृत्यूलोकी जन्म घ्या' असा माझ्या बहिणींना शाप दिला. ही वार्ता माझ्या वडिलांना समजताच ते त्या मुनीकडे गेले. आपल्या मुलींना क्षमा करावी म्हणून त्यांनी मुनीची प्रार्थना केली. पण मुनी म्हणाला, 'राजा, माझा शाप खराच होईल. तुझ्या विनंतीवरून मी अशी व्यवस्था करतो की मृत्यूलोकातही तुझ्या मुलींना पूर्व जन्माचं स्मरण राहील. शिवाय त्या शापापासून कशा मुक्त होतील हेही तुला सांगतो."

एवढे बोलून चंद्रप्रभा थोडा वेळ थांबली. नंतर ती पुढे म्हणाली, 'त्याप्रमाणे माझ्या तिघी बहिणींनी आपआपल्या देहाचा त्याग करून मृत्यूलोकात जन्म घेतला. या घटनेने माझ्या वडिलांस अतिशय दुःख झालं. त्यांनी राज्याची सर्व जबाबदारी माझ्यावर सोपविली आणि वनवास पत्करला. मी देखील फार कष्टी झाले होते. त्यामुळे राज्यकारभाराकडे माझं लक्ष लागणं कठीणच होतं. प्राब्त परिस्थितीमुळं मी अगदी उदास होऊन गेले होते. अशा

वेळी एके रात्री चंडिकादेवी माझ्या स्वप्नात आली आणि मला म्हणाली, मुली, तू कसलीही काळजी करू नकोस. एक साहसी मानव तुझा पती होईल. त्याप्रमाणे देवीच्या सांगण्यावर विश्वास ठेवून मी पुष्कळ विद्याधरांच्या मागणीला नकार देत आजपर्यंत अविवाहितच राहिले. आज अद्‌भुतपणे आपण इथं आलांत, देवीचे शब्द खरे झाले. आता आपण पत्नी म्हणून माझा स्वीकार करा, ही आपल्या चरणी विनंती!'

असे चंद्रप्रभेचे शब्द ऐकताच आपण एखाद्या रम्य स्वप्नात तर नाही ना असे शक्तिदेवास वाटल्यास नवल ते काय! वणव्यातून चटके सोशीत बाहेर पडून अमृताच्या डोहात बुडी मारण्याचा परमानंद त्याला झाला. त्याने मोठ्या आनंदाने चंद्रप्रभेची विनंती मान्य केली. तेव्हा आनंदून चंद्रप्रभा म्हणाली, 'आपल्या विवाहाला प्रथम माझ्या वडिलांची संपती घेण्यासाठी मी येत्या चतुर्दशीला ऋषभ पर्वतावर जाईन. त्या दिवशी तिथं सर्व विद्याधर महेश्वराच्या पूजेकरिता येत असतात. माझे वडिलही तिथं येतील. त्यांची संमती घेऊन मी परत आल्यावर आपण माझं पाणिग्रहण करा.' असे म्हणून चंद्रप्रभेने एका स्वतंत्र महालात शक्तिदेवाच्या राहण्याची व्यवस्था केली. आणि त्याचे विद्याधरास साजेसे आदरातिथ्य केले.

पुढे चतुर्दशीचा दिवस आला. त्या दिवशी सकाळी चंद्रप्रभा शक्तिदेवाला म्हणाली, "महाराज, महेश्वराच्या पूजेसाठी मी आज सर्व सेवकांना बरोबर घेऊन जात आहे. मला परत यायला दोन दिवस लागतील. तोपर्यंत आपणास इथं एकटंच राहावं लागेल. आपणास कंटाळा आला तर आपण या राजमंदिरातील दालनातून फिरावं. फक्त महालात मात्र मुळीच प्रवेश करू नका बरं का!" असे पुन्हा पुन्हा सांगून चंद्रप्रभा ऋषभ पर्वताकडे निघून गेली.

चंद्रप्रभा निघून गेल्यावर शक्तिदेवाला करमेनासे झाले. राजमंदिरातील ऐश्वर्यशाली विविध दालनांत मुक्तपणे फिरत त्याने एक दिवस कसातरी घालविला. दुसऱ्या दिवशी त्याच्या मनात विचार आला, 'चंद्रप्रभेने मधल्या महालात जाऊ नका असं का बरं बजावून सांगितलं! काय असावं त्या महालात!' जे काही असेल ते एकदा बघावं अशी उत्सुकता त्याला वाटली. जावे की न जावे या विचाराच्या गोंधळातच त्याचे पाय त्या महालाकडे वळले. जे कार्य करू नये तेच करण्यासाठी बहुधा माणसाचे मन प्रवृत्त होते.

महालाचा घट्ट लावलेला दरवाजा उघडून शक्तिदेवाने सावधपणे आत प्रवेश केला. तेव्हा त्या प्रशस्त व सजविलेल्या महालातील तीन दालने त्याच्या दृष्टीस पडली. प्रथम समोरच्या दालनाकडे जाताच शक्तिदेवाला तेथे रत्नजडित पलंगावर कोणी तरी व्यक्ती तोंडावर पांघरून घेऊन झोपली आहे असे दिसले. ती व्यक्ति कोण आहे ते पहावे म्हणून शक्तिदेव त्या पलंगाजवळ गेला. त्याने हलकेच त्या व्यक्तीच्या तोंडावरील आच्छादन दूर केले. आणि तत्क्षणीच तो आश्चर्याने उद्गारला, ''कोण कनकरेखा! अशा निर्जीव अवस्थेत ती इथे कशी ? जिच्यासाठी मी नाना प्रकारची संकटे सोसून एवढा दीर्घ प्रवास केला तीच इथं गतप्राण होऊन पडली आहे. पण वर्धमान नगरात तर मी तिला जिवंत व प्रफुल्लित अवस्थेत पाहिलं होतं! हे काय गौडबंगाल आहे ते कळत नाही', असे म्हणत गोंधळलेला शक्तिदेव दुसऱ्या दोन दालनात गेला. तेथेही त्याला तशाच पलंगावर तशाच अचेतन अवस्थेत आणखी दोन कन्या दिसल्या.

तेव्हा जास्तच गोंधळलेला शक्तिदेव त्या महालातून बाहेर पडून उद्यानात गेला. तिथे त्याला एक सुंदर विहीर दिसली. तिच्याजवळ रत्नजडित खोगीर घातलेला एक उमदा घोडा उभा होता. घोड्याच्या पाठीवर हलकेच थाप मारून शक्तिदेव त्याच्यावर स्वार होणार तोच त्या घोड्याने एक जोराचा धक्का देऊन त्याला विहिरीत ढकलून दिले. तेव्हा आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट घडून आली. पाण्यातून वर येताच शक्तिदेवाला आपण आपल्या वर्धमान नगराजवळच्या उद्यानातील एका विहिरीत आहोत असे आढळून आले. तेव्हा तो अत्यंत दुःखी होऊन म्हणाला, 'अरेरे, असं कसं झालं! कनकपुरीचं सारं वैभव एखाद्या सुंदर स्वप्नासारखं एकाएकी कसं नाहीसं झालं? खरंच भवितव्यतेची लीला अतर्क्य आहे!' असे म्हणत कष्टी झालेला शक्तिदेव आपल्या घरी परत गेला. त्याला पाहून घरातील मंडळींना खूप आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी शक्तिदेव घराबाहेर पडला असता कनकपुरी संबंधीची पूर्वीचीच दवंडी पुन्हा त्याच्या कानावर पडली. तेव्हा तो सरळ राजवाड्यात गेला आणि राजाची भेट घेऊन राजाला म्हणाला, 'महाराज, मी कनकपुरी पाहून कालच इथं परत आलो.' तो पूर्वीचाच खोटारडा पुन्हा आलेला पाहून राजाला त्याचे म्हणणे खरे वाटेना. तेव्हा शक्तिदेव निर्धारपूर्वक म्हणाला, 'महाराज, माझं बोलण खोटं ठरलं तर आपण मला खुशाल सुळावर चढवा!'

असे शक्तिदेवाचे बोलणे ऐकून राजाने कनकरेखेला बोलावून घेतले. तिथे येताच तिने शक्तिदेवाला पाहिले आणि ती आपल्या वडिलांना म्हणाली, 'बाबा, हा खोटारडा माणूस पुन्हा काही खोटं सांगण्यासाठीच का इथं आला आहे ?'' तेव्हा शक्तिदेव तिला म्हणाला, 'राजकन्ये, मी खरं सांगतो की खोटं, ते तुझं तूच पहा. पण कनकपुरीत रत्नजडित पलंगावर मृत होऊन पडलेली तू, इथं अजून जिवंत कशी ? हा काय चमत्कार आहे ते आधी मला सांग !' असे शक्तिदेवाचे बोलणे ऐकताच कनकरेखा विस्मयाने जागीच तटस्थ झाली... शक्तिदेवाने कनकपुरी पाहिली अशी तिची खात्री झाली.

ती आपल्या वडिलांजवळ जाऊन म्हणाली, 'बाबा, खरंच या भाग्यवंतानं कनकपुरी पाहिली आहे. त्यांना मी टाकून बोलले ही माझी चूक झाली. बाबा, मी एक विद्याधरी आहे. मुनीच्या शापामुळं मी तुमच्या कुलात जन्म घेतला. जेव्हा कोणी मानवानं कनकपुरीतील माझा मृत देह पाहून माझं सत्य स्वरूप प्रगट केल्यावर मी शापमुक्त होणार होते, ती वेळ आता आली आहे. मी आता कनकपुरीतील माझ्या पूर्व शरीरात प्रवेश करते. लवकरच या भाग्यवंताशी माझा कनकपुरीतच विवाह होईल. जाते मी,' असे म्हणून कनकरेखेने राजाला वंदन केले आणि देहत्याग केला. कनकरेखा अकस्मात मृत झाल्यामुळे राजा मूर्च्छित पडला. आणि राजवाड्यात हाहाकार उडाला. अत्यंत दुःखी झालेल्या शक्तिदेवाला काय करावे ते सुचेना. तो सरळ राजवाड्याबाहेर पडला.

रस्त्याने जाताना त्याच्या मनात विचार आला, ' उगीच का मी दुःखी व कष्टी व्हावे ! कोणत्याही सिद्धीला धैर्याची अपेक्षा असते. कनकरेखेने सांगितल्याप्रमाणे तिच्याशीच माझा विवाह होणार आहे. तेव्हा पूर्वीच्याच मार्गानं आपण पुन्हा कनकपुरीस गेलं पाहिजे. या खेपेसही माझ्या प्रयत्नाला दैवाची साथ मिळेल.' अशा विचाराने शक्तिदेवाने पुन्हा सरळ कनकपुरीचा मार्ग धरला. धैर्यशाली पुरुष हाती घेतलेले कार्य पूर्ण केल्यावाचून प्रयत्न सोडीत नाही. पुन्हा हालअपेष्टा सोसून शक्तिदेव प्रथम विटकपुरास गेला. त्या नगरात प्रवेश करताच त्याला, पहिल्यांदा ज्याच्याबरोबर आपण उत्स्थल द्वीपाला निघालो होतो तो समुद्रदत्त आढळला. नौका अपघाताच्या प्राणसंकटातून ईश्वरी कृपेने वाचल्याबद्दलची दोघांनीही आपापली हकीकत सांगून एकमेकांचे

अभिनंदन केले. समुद्रदत्ताने मोठ्या अगत्याने शक्तिदेवाला आपल्या घरी नेऊन त्याचे चांगल्या प्रकारे आदरातिथ्य केले. दुसऱ्या दिवशी त्याने आपल्या एका व्यापारी मित्राबरोबर शक्तिदेवाची उत्स्थल द्वीपाकडे रवानगी केली.

यथावकाश शक्तिदेव निर्विघ्नपणे उत्स्थल द्वीपास पोहोचला. नंतर तिथे असलेल्या आतेभावाकडे म्हणजे विष्णुगुप्ताकडे जावे म्हणून तो मठाकडे निघाला. पण वाटेतच त्याला कोळ्यांच्या सत्यव्रत राजाचे मुलगे भेटले. त्यांनी शक्तिदेवाला विचारले, 'अहो महाराज, तुम्ही एकटेच कसे इथं परत आलात ? आमचे बाबा कुठं आहेत ?' तेव्हा शक्तिदेव दु:खित स्वरात त्यांना म्हणाला, ' समुद्रातल्या वडवामुख नावाच्या भोवऱ्यात तुमचे वडील नौकेसम गडप झाले !' अशा शक्तिदेवाच्या बोलण्यावर सत्यव्रताच्या मुलांचा विश्वास बसला नाही. ते रागाने आपल्या सेवकांना म्हणाले, 'या दुष्ट माणसाच्या मुसक्या बांधा. यानेच आमच्या वडिलांना ठार मारलं असावं. एकाच होडीतून गेलेल्या दोघांपैकी एक होडीसह वडवामुखात पडतो आणि एक जिवंत राहतो हे कसं शक्य आहे ? या दुष्टाला उद्या सकाळी चंडिकादेवीपुढं बळी द्या !' त्याप्रमाणे त्या सेवकांनी शक्तिदेवाला बांधून भयंकर अशा चंडिकागृहात नेऊन टाकले.

बिचारा शक्तिदेव ध्यानी मनी स्वप्नी नसता अकस्मात आलेल्या या प्राणसंकटाने गोंधळून गेला. निर्वाणीचा उपाय म्हणून प्राणरक्षणार्थ त्याने एकाग्र चित्ताने चंडिकेची प्रार्थना केली. मग त्याला थोडी झोप लागली. तेव्हा देवी स्वप्नात येऊन त्याला म्हणाली, 'शक्तिदेवा, घाबरू नकोस, तुझं अकल्याण कधीही होणार नाही ! या कोळ्यांच्या पुत्रांची बहीण बिंदुमती उद्या सकाळी इथं येईल. आणि तुला पाहून ती आपल्याशी विवाह करण्याची तुला विनंती करील. तेव्हा तू तिला तुझी संमती दे. ती कोळ्याची मुलगी म्हणून तू तिला नकार देऊ नकोस. ती शापभ्रष्ट झालेली एक विद्याधरी आहे. ती तुझी या प्राणसंकटातून मुक्तता करील !'. असे म्हणून ती देवी अदृश्य झाली. शक्तिदेव जागा झाला आणि थोड्या वेळाने सकाळ झाली. तेव्हा बिंदुमती तिथे आली. शक्तिदेवाला पाहताच तिने त्याला मनाने वरले. ती म्हणाली, 'महाराज, तुम्ही माझ्याशी लग्न करणार असाल तर मी तुमची या प्राणसंकटातून सुटका करते.' असे तिचे शब्द ऐकून शक्तिदेवाला स्वप्नातील देवीचे शब्द आठवले. त्याने तिचे म्हणणे मान्य केले. पुढे यथाविधी बिंदुमतीशी विवाह करून शक्तिदेव तिच्याच घरी सुखाने राहू लागला.

एके दिवशी रस्त्याने गोमांस घेऊन जाणाऱ्या एका चांडाळाला शक्तिदेवाने वाड्याच्या माडीवरून पाहिले. तेव्हा तो बिंदुमतीला म्हणाला, 'प्रिये, त्रिभुवनाला वंदनीय असलेल्या गायीचे मांस खाणारा तो दुष्ट किती पापी आहे!' असे शक्तिदेवाचे शब्दे ऐकून बिंदुमती म्हणाली, 'महाराज, ते पाप किती भयंकर त्याची कल्पनाच करता यायची नाही. गायीचा क्षुल्लक अपराध केल्यामुळेच मला या कोळीकुलात जन्म घ्यावा लागला!' तेव्हा कुतूहलाने शक्तिदेवाने तिला विचारले, 'बिंदुमती, तुझ्या जन्माचे रहस्य काय ते मला सांग!' 'फक्त एका अटीवर', बिंदुमती म्हणाली, 'प्रथम माझं एक म्हणणं तुम्ही कृपा करून मान्य कराल तर माझ्या जन्माचे रहस्य मी तुम्हाला सांगेन.' 'ठीक आहे. सांग, तुझं काय म्हणणं आहे ते!' तेव्हा बिंदुमती म्हणाली, 'आर्यपुत्र, थोड्याच दिवसात आणखी एक स्त्री आपली पत्नी होईल. तिच्या उदरी एक मूल जन्माला येईल. पण ते जन्माला येण्यापूर्वीच आपण तिचे पोट फाडून त्या मुलाची मान पकडली पाहिजे.' असे बिंदुमतीचे भयंकर शब्द ऐकून शक्तिदेव उद्‌गारला, 'छे,छे, तसलं अघोरी काम मी मुळीच करणार नाही!' पण बिंदुमतीचे म्हणणे मान्य करायचे आधीच वचन दिल्यामुळे नाईलाजाने त्याला 'ठीक आहे' असे म्हणावे लागले.

नंतर बिंदुमती त्याला म्हणाली, 'महाराज, गेल्या जन्मी मी एक विद्याधरी होते. त्यावेळी एका वीणेला लावलेली गायीच्या शुष्क स्नायूची तार मी दातांनी तोडली. त्यामुळे शापभ्रष्ट होऊन कोळ्याच्या कुळात माझा जन्म झाला आहे तेव्हा प्रत्यक्ष गोमांस खाणाऱ्याची काय गती होत असेल ते परमात्माच जाणे!' असे बिंदुमती सांगत आहे तोच तिचा एक भाऊ त्वरेने तिथे आला व शक्तिदेवाला म्हणाला, 'महाराज, एका भयंकर रानडुक्करानं सर्वत्र हलकोल्लोळ उडविला आहे. आतापर्यंत त्यानं पुष्कळ लोकांना ठार मारलं आहे. तुम्ही सत्वर त्याचा नाश करा.' हे ऐकताच शूर शक्तिदेव त्वरेने हाती शस्त्र घेऊन एका चपळ घोड्यावर स्वार झाला आणि त्या भयंकर डुकराच्या समाचारार्थ वेगाने निघाला.

अरण्याच्या सीमेवर शक्तिदेवाने डुकराला गाठले. तेव्हा चवताळलेल्या डुकराने मागे फिरून शक्तिदेवावर हल्ला केला. पण सावध असलेल्या शक्तिदेवाने त्या डुकराच्या मर्मस्थानी आपल्या हातातील शस्त्राचा एक जबरदस्त प्रहार केला. त्यामुळे प्राणांतिक जखमी झालेला तो डुक्कर माघार

घेऊन आपल्या गुहेकडे पळू लागला. तेव्हा त्याला ठार मारण्यासाठी शक्तिदेवही त्वरेने त्याची पाठलाग करू लागला. डुक्कर गुहेत शिरला असे पाहून निर्भय शक्तिदेवाने आपला घोडा एका झाडाला बांधला आणि हातात तलवार घेऊन तो गुहेत शिरला. पण तेथे त्याला जखमी डुक्कर न दिसता एक अलौकिक दृश्य दिसले. ते पाहून तो आश्चर्याने जागीच खिळून उभा राहिला.

त्या गुहेच्या आतल्या बाजूस एक मोठी सुंदर बाग होती. त्या बागेच्या मध्यभागी असलेल्या एका भव्य मंदिरातून एक सुंदर कन्या घाईघाईने त्याच्याच दिशेने येत होती. ती जवळ येताच शक्तिदेवाने तिला विचारले, 'हे कल्याणी, तू कोण ? एवढ्या घाँईत्त कुठं निघालीस ?' तेव्हा ती म्हणाली, 'महाराज, दक्षिणे कडील चंडविक्रम राजाची मी कन्या. माझं नाव बिंदुरेखा. एका दुष्ट दैत्यानं कपटानं मला पळवून इथं आणून ठेवलं. मांस खाण्यासाठी आज सकाळी तो डुकराचं रूप घेऊन बाहेर पडला. पण कोणा शूरवीरानं त्याला प्राणांतिक जखमी केलं. तो इथं येताच तत्काळ मरून पडला. म्हणून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी मी इथून घाईनं निघाले आहे !' 'आता तू भिऊ नकोस.' शक्तिदेव म्हणाला, ' त्या दुष्टाला मीच प्राणांतिक जखमी केलं होतं. मी वर्धमान नगरचा. माझं नाव शक्तिदेव.' तेव्हा बिंदुरेखा म्हणाली, 'महाराज, तुम्हीच माझ्या प्राणांचे रक्षण केलं. आता तुम्हीच माझे प्राणनाथ होऊन पत्नी म्हणून माझा स्वीकार करा, हीच आपल्या चरणी माझी विनंती.' शक्तिदेवाने मोठ्या आनंदाने तिची विनंती मान्य केली आणि तिला घेऊन तो घरी गेला. नंतर बिंदुमतीच्या संमतीने त्याने बिंदुरेखेशी विवाह केला.

पुढे काही दिवसांनी बिंदुरेखा गरोदर राहून तिच्या प्रसूतीची वेळ जवळ आली. तेव्हा बिंदुमती शक्तिदेवाला म्हणाली,'महाराज, पूर्वी मला वचन दिल्याप्रमाणे बिंदुरेखेचं पोट फाडून तिच्या मुलाची मान पकडून त्याला बाहेर काढा. तसं करण्यात तुमचं कल्याणच आहे.' असे बिंदुमतीचे शब्द ऐकून शक्तिदेव अत्यंत कष्टी झाला. मोठ्या दुःखित अंतःकरणाने तो बिंदुरेखेकडे गेला. तेव्हा बिंदुरेखा त्याला म्हणाली, 'प्राणनाथ, आपण एवढे दुःखी कष्टी का होता ? आपणास बिंदुमतीनं माझ्याकडं का धाडलं ते मी जाणते. तिला दिलेले वचन आपण पाळलंच पाहिजे. कारण तसं करण्यानं काही गुप्त हेतू साध्य होणार आहे. त्यामुळं ते कार्य मुळीच निष्ठुर नाही.'

असे बिंतुरेखेने सांगितले तरीही ते क्रूर पाप करण्यास शक्तिदेव माघार घेऊ लागला. तेव्हा आकाशवाणी झाली, 'शक्तिदेवा, कुठलीही शंका मनात न आणता तू बिंदूरेखेचे पोट फाडून तिच्या मुलाची मान धरून त्याला बाहेर काढ. म्हणजे तुला दिव्य शक्ती प्राप्त होईल.' अशी आकाशवाणी ऐकताच आपले हृदय पाषाणासारखे करून शक्तिदेवाने बिंदुरेखेचे पोट फाडले व मुलाची मान पकडली. तेव्हा मोठ्या नवलाची गोष्ट घडली. त्या मुलाच्या मानेऐवजी शक्तिदेवाच्या हातात एक दिव्य असे तेजस्वी खड्ग तळपू लागले. आणि शक्तिदेव विद्याधर बनला. बिंदुरेखा अदृश्य झाली.

नंतर विद्याधर बनलेल्या शक्तिदेवाने घडलेली हकीकत बिंदुमतीलाला सांगितली. तेव्हा ती म्हणाली, 'प्राणनाथ, आतापर्यंत घडलेल्या ज्या घटनांचं तुम्हाला नवल वाटतं त्यांचं रहस्य मी आता प्रगट करते. कनकपुरीत राहणाऱ्या आम्हा तिघी बहिणींना मुनीच्या शापामुळं भूलोकी जन्म घ्यावा लागला. त्यापैकी वर्धमान नगरातील कनकरेखा शापमुक्त झाल्याचे तुम्ही पाहिलचं आहे. आज बिंदुरेखाही आपणास दिव्य खड्ग अर्पण करून शापमुक्त झाली व कनकपुरीस गेली. आता उरले मी. मलाही लगेज कनकपुरीस गेलल पाहिजे. तिथं आमची सर्वात थोरली बहीण चंद्रप्रभा आम्हा तिघी बहिणींच्या पूर्वशरीरांचे रक्षण करीत आहे. आपण लवकर कनकपुरीस या आणि आमच्या वडिलांकडून आम्हा सर्वजणींचा यथाविधी स्वीकार करा.' एवढे बोलून बिंदुमती अदृश्य झाली. आतापर्यंत आपण सहन केलेल्या सर्व कष्टांचे आपल्या अपेक्षेपेक्षा जास्तच गोड सार्थक झाले याचा शक्तिदेवाला किती आनंद झाला असेल याची कल्पनाच करावी.

नंतर ज्याला विद्याधराचे शरीर व सामर्थ्य प्राप्त झाले आहे असा शक्तिदेव आकाशमार्गाने कनकपुरीस गेला. तिथे चंद्रप्रभेने त्याचे अपूर्व स्वागत केले. मोठ्या सन्मानाने त्याला आपल्या महालात नेऊन आपल्या बहिणींची ओळख करून देताना ती म्हणाली, 'महाराज, आपण वर्धमान नगरात जी कनकरेखा पाहिलीत ती ही माझी चंद्ररेखा नावाची बहीण. उत्स्थल द्वीपातील कोळ्यांच्या राजाची मुलगी बिंदुमती ती ही माझी दुसरी बहीण शशिरेखा. राक्षसाला मारून तुम्हाला प्राप्त झालेली बिंदुरेखा ती ही माझी तिसरी बहीण शशिप्रभा. आता आपण सर्व आमच्या वडिलांकडे जाऊ ते आपणास आम्हा सर्व जणींचे दान करतील.'

नंतर चंद्रप्रभेने आपल्या तिघी बहिणींसह शक्तिदेवाला वनात राहणाऱ्या आपल्या वडिलांकडे म्हणजे शशिखंड विद्याधर राजाकडे नेले. तिथे शशिखंडाने आपल्या चारी मुली विधिपूर्वक शक्तिदेवाला अर्पण केल्या. आणि सर्व विद्यांबरोबर आपले राज्यही देऊन त्याने शक्तिदेवाला महाप्रतापी विद्याधर बनविले. अखेर तो म्हणाला, 'शक्तिदेव, वत्सराज उदयनाचा पुत्र नरवाहनदत्त पुढं सर्व विद्याधरांचा सम्राट होणार आहे. तो तुझा स्वामी. फक्त त्याला मात्र तू वंदन कर!' असे बोलून शशिखंडाने सर्वांना मोठ्या प्रेमाने निरोप दिला.

नंतर शक्तिदेव आपल्या चारी भार्यांसह कनकपुरीस गेला आणि तेथे सर्व सुखांचा व विद्याधरांच्या ऐश्वर्याचा आस्वाद घेत परमानंदात राहिला.

❦ ❦

[illegible]
[illegible]
२९७६ दिनांक ३१|३|९४
[illegible]

# रूपशिखेचे चातुर्य

फार वर्षापूर्वी आपल्या भारतात वर्धमानपूर नावाचे एक प्रसिद्ध नगर होते. त्या नगराचा राजा वीरभुज मोठा धार्मिक व प्रजाहितदक्ष होता. गुणवरा ही राजाची आवडती राणी होती. त्यामुळे राजाच्या इतर राण्या गुणवरेचा मत्सर करीत. त्यांनी राजाला भलते सलते सांगून तिच्याविषयी त्याचे मन कलुषित केले. त्यामुळे राजाने गुणवरेला अंधारकोठडीत ठेवले. गुणवरेचा मुलगा शृंगभुज हा सद्‌गुणी असल्याने राजाचा फार आवडता होता. तो आपल्या सावत्र भावात सर्वात लहान पण बलिष्ठ व उत्कृष्ट तीरंदाज होता. आपल्या मुलापेक्षा गुणवरेचा शृंगभुज राजाला जास्त प्रिय आहे हे इतर राण्यांना बघवत नसे. गुणवरेची रवानगी अंधारकोठडीत झाली, आता शृंगभुजालाही राजापासून दूर करावे या हेतुने अयशोलेखा नावाची राणी आपल्या मुलास म्हणाली, 'तुम्हा सर्व सावत्र भावांपेक्षा शृंगभुज राजाचा फार आवडता आहे. तो इथून निघून जाईल असा एखादा उपाय तू आपल्या इतर सावत्र भावांच्या विचारानं शोधून काढ.' त्याप्रमाणे त्याने आपल्या इतर भावांच्या संमतीने शृंगभुजाला नगरातून बाहेर घालविण्याचा बेत रचून तो योग्य वेळेची वाट पाहात राहिला.

एके दिवशी धनुर्विद्येचे प्रयोग करीत असलेल्या सर्व राजपुत्रांनी राजवाड्याच्या मनोऱ्यावर बसलेला एक भला मोठा बगळा पाहिला. तो महाकाय बगळा पाहून त्यांना मोठे आश्चर्य वाटले. तेवढ्यात एक भिक्षू तेथे आला. तो म्हणाला, 'राजपुत्रांनो, तुम्हाला दिसतो तो बगळा खरा नाही. बगळ्याच्या रूपानं नगराचा नाश करीत फिरणारा तो अग्निशिख नावाचा एक राक्षस आहे. त्याच्यावर बाण सोडून त्याला उडवून लावा!' असे त्या भिक्षूचे बोलण ऐकून शृंगभुजाखेरीज सर्व राजपुत्रांनी त्या बगळ्यावर बाण सोडले. पण एकाचाही बाण त्या बगळ्याला लागला नाही. तेव्हा भिक्षू म्हणाला, 'तुमचा

सर्वात लहान भाऊ त्याच्या हाती धनुष्यबाण द्या. तो चांगला तिरंदाज असल्याने बगळ्याला मारून टाकील.'

शृंगभुजाला नगराबाहेर घालविण्याची ही एक अनायासे चांगली संधी आली आहे. तेव्हा तिचा उपयोग करून घेण्याचे शृंगभुजाच्या सावत्रभावांनी ठरविले. त्यांनी मुद्दामच आपल्या वडिलांचा म्हणजे वीरभुज राजाचा रत्नजडित बाण धनुष्यासह शृंगभुजाला दिला. शृंगभुजाने तो बाण धनुष्याला लावला आणि बरोबर नेम धरून तो बगळ्यावर सोडला. तो बगळ्याच्या अंगात घुसताच बगळा बाणासह उडून गेला. पण त्याच्या जखमेतून रक्ताची धार पडत असल्याने तो कोणत्या दिशेने गेला हे कळणे सहज शक्य होते.

बगळा उडून गेल्यावर शृंगभुजाचे सावत्रभाऊ शृंगभुजाभोवती जमले आणि त्याला म्हणाले, 'आता बाबांचा रत्नजडित बाण तू परत आणून दे. नाही तर आम्ही तुझ्यासमोर जीव देऊ. बाण हरवला असं जर बाबांना कळलं तर ते रागावून आम्हाला नगराबाहेर घालवून देतील!' तेव्हा शृंगभुज त्यांना म्हणाला, 'तुम्ही घाबरू नका. काही काळजी करू नका. मी त्या दुष्ट राक्षसाला मारून बाबांचा रत्नजडित बाण परत घेऊन येतो' असे बोलून बाणासह आपले धनुष्य घेऊन शृंगभुज जमिनीवर पडत गेलेल्या रक्तधारेवरून त्या दुष्ट राक्षसाचा माग काढीत तडक निघाला. तो निघून गेल्यावर आता तो कधीही जिवंत परत येणार नाही अशी खात्री वाटून त्याच्या सर्व सावत्र भावांना खूप आनंद झाला हे सांगणे नकोच.

तिकडे शृंगभुज जखमी झालेल्या बगळ्याचा पाठलाग करीत एका अरण्यात येऊन पोहोचला. तेथे त्याला एक सुंदर नगर आढळले. नगराच्या बाहेर एक रम्य बाग होती. त्या बागेतील एक झाडाखाली शृंगभुज विसावा घेण्यासाठी बसला. तेवढ्यात एक सुंदर कन्या एका लताकुंजाजवळून आपल्याच दिशेने येत आहे असे त्याला दिसले. तेव्हा त्याला मोठे आश्चर्य वाटले. ती जवळ येताच शृंगभुजाने तिला विचारले, 'सुंदरी, या नगराचं नाव काय ? तू कोण व इथं कशी ?' असे शृंगभुजाचे प्रश्न ऐकून ती सुंदरी मंजुळ व प्रेमळ शब्दात म्हणाली, 'महाराज, या नगराचं नाव मधुपुर. इथं अग्निशिख नावाचा महाराक्षस राहतो. त्याची मी मुलगी. माझं नाव रूपशिखा. तुमचं देखणं

रूप पाहून मी तुम्हाला मनानं वरलं आहे. आता तुम्ही कोण आणि इथं का आला ते मला सांगा.' तेव्हा शृंगभुजाने आपण कोण व इथं का आलो त्याचे कारण तिला सांगितले. ते ऐकून रूपशिखा म्हणाली, 'माझ्या बलाढ्य बाबांना आपल्या अचूक बाणाने जखमी करणारे तुम्ही चांगलेच साहसी धनुर्धर दिसता. बाबांच्या एका मंत्र्यानं महाऔषधानं त्यांना आता बरे केलं आहे. तो रत्नजडित बाण मी माझ्यापाशी ठेवून दिला आहे. मी आता जाते आणि बाबांना विचारून तुम्हाला घराकडे घेऊन जाण्यासाठी पुन्हा परत येते. तोपर्यंत तुम्ही इथचं थांबा.' असे म्हणून रूपशिखा निघून गेली.

घरी गेल्यावर ती थेट आपल्या बापाकडे गेली. आणि लज्जेमुळे खाली मान घालून मोठ्या नम्रतेने त्याला म्हणाली, 'बाबा, आपल्या नगराजवळच्या बागेत कोणी शृंगभुज नावाचा रूप, गुण, कुल व शील यांनी उत्तम असा एक राजपुत्र आला आहे. त्याच्याशीच विवाह करण्याची तुम्ही मला आज्ञा दिली नाही तर मी या जगात राहणार नाही!' असे आपल्या लाडक्या मुलीचे शब्द ऐकून अग्निशिख तिला म्हणाला, 'मुली, तुला माहीतच आहे की मनुष्य प्राणी आमचं भक्ष्य आहे. तरी सुद्धा त्या राजपुत्राला इथं घेऊन ये. मला पाहू दे कसा आहे तो!' अशी बापाची आज्ञा मिळाल्यावर आनंदित झालेली रूपशिखा त्वरेने बागेकडे गेली आणि शृंगभुजाला बरोबर घेऊन घराकडे परतली.

शृंगभुजाला पाहताच खुश होऊन अग्निशिखाने त्याचा आदरसत्कार केला. नंतर तो म्हणाला, 'राजपुत्रा, मी सांगेन त्याप्रमाणे तू वागशील तर माझी कन्या रूपशिखा मी तुला देईन. तेव्हा शृंगभुज म्हणाला, 'ठीक आहे. तुम्ही सांगाल तसं मी वागेन.' मग खुश झालेल्या अग्निशिखाने शृंगभुजाला स्नानार्थ स्नानगृहाकडे जाण्यास व रूपशिखेला आपल्या बहिणींना घेऊन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे ती दोघे निघाली. अग्निशिखाच्या दृष्टिआड झाल्यावर चतुर रूपशिखा शृंगभुजाला म्हणाली, ''महाराज, तुम्हाला मी एक महत्त्वाची गोष्ट सांगते. ती लक्षपूर्वक ऐका. माझ्यासारख्याच रूपसंपन्न व अविवाहित अशा मला शंभर बहिणी आहेत. आम्ही सर्वजणी कपडे, अलंकार यांच्या बाबतीत अगदी एकसारख्या आहोत. आम्हा सर्वांना एकत्र आणून 'यातील जी तुला आवडेल तिच्या गळ्यात तू माळ घाल' असे माझा पिता तुम्हाला

म्हणेल. तेव्हा तुम्हाला माझी ओळख पटावी म्हणून मी आपल्या गळ्यातील हार काढून तो डोक्यावर ठेवीन. ते पाहून तुम्ही निःशंकपणे आपल्या हातातील माळ माझ्या गळ्यात घाला. माझ्या मंद बुद्धीच्या व विचारहीन पित्याचं कपटनाटक मला चांगलं माहीत आहे. तुमची फसवणूक करावी म्हणून तो तुम्हाला आणखी काही गोष्टी करायला सांगेल. तेव्हा तुम्ही नुसतं 'बरं आहे' असं म्हणा आणि तो जे काही सांगेल ते ताबडतोब मला सांगा!''

'ठीक आहे. तसंच करतो' असे म्हणून शृंगभुज स्नानगृहाकडे गेला. आणि रूपशिखा आपल्या सर्व बहिणींना एकत्रित करण्यासाठी निघून गेली. थोड्या वेळानंतर स्नान करून आलेला शृंगभुज अग्निशिखाकडे गेला. तेव्हा तिथे त्याला वस्त्रालंकारांनी नटलेल्या अगदी रूपशिखेसारख्याच शंभर कन्या दिसल्या. अग्निशिखाने फुलांची एक मोठी माळ शृंगभुजाच्या हाती दिली आणि तो म्हणाला, 'तुझ्यासमोर असलेल्या माझ्या कन्यांपैकी तुला जी पसंत पडेल तिच्या गळ्यात ही माळ घाल!' त्याच क्षणी रूपशिखेने आपल्या गळ्यातील हार डोक्यावर ठेवला. ती खूण ओळखून शृंगभुजाने रूपशिखेच्याच गळ्यात माळ घातली. तेव्हा 'उद्या सकाळी मी तुमचा विवाह करीन.' असे त्या दोघांना सांगून अग्निशिखाने त्यांना व आपल्या इतर कन्यांना जाण्यास सांगितले.

नंतर थोड्या वेळाने शृंगभुजास बोलावून घेऊन अग्निशिक्ष त्याला म्हणाला, 'राजपुत्रा, दोन बैलांचा नांगर घे. नगराबाहेर जा. जमीन नांगर, आणि तिथे असलेल्या तिळाच्या ढिगाऱ्यातले शंभर मण तीळ पेरून परत ये.' 'बरं आहे', असे म्हणून शृंगभुज तेथून निघाला. हे अशक्य काम आपल्या हातून कसे पार पडणार या चिंतेतच तो सरळ रूपशिखेकडे गेला. आणि त्याने तिला अग्निशिखाची आज्ञा सांगितली. तेव्हा ती म्हणाली, 'महाराज, आपण मुळीच काळजी करू नका. दोन बैल घेऊन आपण फक्त नगराबाहेर जा. मी आपल्या विद्येनं ते महाकठीण काम करून टाकीन.' त्यामाणे दोन बैल घेऊन शृंगभुज नगराबाहेर गेला. त्याने पाहिले, सर्वत्र जमीन खडकाळ होती. आणि जवळच तिळाचा एक भला मोठा डोंगर होता. मोठ्या कष्टाने शृंगभुजाने जमिनीची नांगरट सुरू केली. पण दैव प्रसन्न झाले म्हणजे फार अवघड वाटणाऱ्या गोष्टी सुद्धा सहज सोप्या होऊन जातात. तसेच तिथे झाले. जमीन चांगली नांगरून

तिळांनी पेरलेली आहे असे शृंगभुजाला आढळून आले. तेव्हा तो फारच आश्चर्यचकित झाला. लगेच अग्निशिखाकडे जाऊन शृंगभुज त्याला म्हणाला, 'तुम्ही सांगितलेल्या आज्ञेप्रमाणं सर्व काम झालं आहे.'

असे शृंगभुजाचे शब्द ऐकून तो कपटी अग्निशिख म्हणाला, 'खरोखर ते काम तुला सांगायला नको होतं. ते पेरलेले तीळ माझ्या काही उपयोगाचे नाहीत. तेव्हा तू ते सगळे तीळ पुन्हा गोळा करून त्यांची होती तशी पुन्हा रास करून ठेव!' 'बरं आहे.' असे म्हणून शृंगभुज पुन्हा रूपशिखेकडे गेला. त्याने तिला अग्निशिखाचे म्हणे सांगताच तिने आपल्या मायेने त्या शेतात हजारो मुंग्या निर्माण केल्या आणि त्यांच्याकडून सर्व तीळ गोळा करून त्यांची होती तशी रास करून ठेवली. या गोष्टींचे नवल करीत शृंगभुजाने, 'सांगितल्याप्रमाणे तिळाची रास करून ठेवली आहे,' असे समक्ष अग्निशिखाला सांगितले.

तेव्हा तो लुच्चा आणि मूर्ख राक्षस शृंगभुजाला म्हणाला, ''राजपुत्रा, दक्षिण दिशेला इथून आठ कोसावर अरण्यात एक निर्जन शिवमंदिर आहे. तिथं धूमशिख नावाचा माझा भाऊ राहतो. 'उद्या सकाळी साजऱ्या होणाऱ्या रूपशिखेच्या विवाहास तू सर्व परिवारासह ये.' असा धूमशिखाला माझा निरोप सांगून तू आजच इथं परत ये.'' तेव्हा 'बरं आहे' असे म्हणून शृंगभुजाने लगेच ती गोष्ट रूपशिखेला सांगितली. मग त्या चतुर स्त्रीने शृंगभुजाला माती, पाणी, काटे व अग्नि या वस्तूसह आपला वेगवान घोडा दिला आणि म्हटले, 'श्री शंकराला नमस्कार करून या घोड्यावर आरूढ व्हा. धूमशिखाला बाबांचा निरोप सांगून त्याच क्षणी तेथून घोड्यावर भरधाव निघा. अधूनमधून मागं दृष्टी टाकण्यास विसरू नका. धूमशिख मागून येत आहे असे दिसले तर प्रथम माती मागे फेकून द्या. तिच्यामुळं त्याची चाल थांबली नाही तर पाणी मागे टाका. तरीही तो पाठलाग करू लागला तर काटे फेका. एवढं करून सुद्धा तो मागं येत राहिला तर अग्नीलाही मागे फेकून द्या. म्हणजे तुम्ही इथं सुखरूप परत याल. न भिता निःशंकपणे मी सांगितलं तसं करा. माझी विद्या किती प्रभावी आहे ते तुम्हाला दिसेलच.'

त्याप्रमाणे निर्भय शृंगभुज वेगाने घोडदौड करून अरण्यातील शून्य शिवमंदिराजवळ उतरला. मंदिरात श्री शंकराची भव्य मूर्ती होती. तिच्या

डावीकडे पार्वती, मांडीवर गणपती व पुढे पांढरा शुभ्र नंदी होता. मंदिरात जाताच 'जय शिवशंकर हर हर' असे मोठ्यांदा म्हणून शृंगभुजाने मूर्तीला वंदन केले. त्या भव्य मंदिरात त्याच्या आवाजाचा घुमलेला पडसाद कानी पडताच काहीसा भ्यालेला शृंगभुज तडक मंदिराबाहेर पडून घोड्यावर स्वार झाला. आणि मंदिरासमोर अग्निशिखाचा निरोप उच्चारून त्याने घोड्याला टाच मारली. तेव्हा घोडा वेगाने पळू लागला. काही अंतर काटल्यावर शृंगभुजाने मागे वळुन पाहिले. धूमशिख त्याच्यामागून येत होता. तेव्हा प्रथम त्याने आपल्यापाशी असलेली माती मागे फेकली. तो काय आश्चर्य! त्या मातीचा धूमशिखाच्या मार्गात एक पर्वत निर्माण झाला. पुन्हा काही अंतर वेगाने पुढे गेल्यावर शृंगभुजाने मागे वळून पाहिले तेव्हा तो पर्वत ओलांडून तो राक्षस येत आहे असे दिसताच शृंगभुजाने पाणी मागे टाकले. त्या पाण्याची एक मोठी नदी झाली. त्या नदीने धूमशिखाला अडविले. पण त्याने ती नदी पार करून शृंगभुजाचा पाठलाग चालू ठेवला. तेव्हा शृंगभुजाने काटे मागे फेकले. त्या काट्यांचे दाट असे काटेरी झाडांचे अरण्य झाले. त्यातूनही मार्ग काढून जेव्हा धूमशिख पाठलाग करू लागला तेव्हा शेवटचा उपाय म्हणून शृंगभुजाने अग्नी मागे फेकला. त्या अग्नीने वणव्याचे स्वरूप धारण केले. गवत झाडेझुडपे जाळून भस्म करणारी भयंकर आग सर्वत्र पसरली. तेव्हा धूमशिखाचा नाइलाज झाला. अग्नीमुळे त्याला शृंगभुजाला पकडणे अशक्य झाले. मोठा खिन्न होऊन तो शिवमंदिराकडे परत गेला.

अखेर रूपशिखेच्या विद्याप्रभावामुळे शृंगभुज सुखरूपपणे मधुपुरास पोहोचला. प्रथम त्याने रूपशिखेकडे जाऊन घडलेली सर्व हकीकत तिला सांगितली. नंतर अग्निशिखाकडे जाऊन तो म्हणाला, 'तुम्ही सांगितल्याप्रमाणे तुमच्या भावाला निरोप सांगून आलो.' शृंगभुजाच्या या शब्दावर अग्निशिखाचा विश्वास बसला नाही. म्हणून त्याने शृंगभुजाला शिवमंदिराचे वर्णन करण्यास सांगितले. ते त्याने अचूकपणे केले. तेव्हा आश्चर्यचकित झालेला अग्निशिख स्वतःशी विचार करू लागला, 'ज्याअर्थी माझा भाऊ धूमशिख या राजपुत्राला पकडून खाऊ शकला नाही त्याअर्थी हा राजपुत्र सामान्य मानव नसून कुणी देव असला पाहिजे. म्हणून हा रूपशिखेला योग्य वर आहे.' या विचाराने तो

आनंदित झाला. आणि त्याने शृंगभुजाला रूपशिखेकडे पाठविले. रूपशिखेने आपल्या राक्षसी विद्येने शृंगभुजाला साह्य केले आहे हा विचार मठ्ठ अग्निशिखाच्या डोक्यातही आला नाही.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी अग्निशिखाने यथाविधी विवाह करून रूपशिखा शृंगभुजाला अर्पण केली. पुढे काही दिवस शृंगभुज मधुपुरात राहिला. नंतर एके दिवशी तो रूपशिखेला म्हणाला, 'आता इथं राहणं पुरे. आपण आपल्या वर्धमानपुरास जाऊं. सोन्याच्या बाणाच्या निमित्तानं माझ्या सावत्र भावांनी मी राज्याबाहेर कायमचे निघून जावे असा डाव टाकला होता हे मी जाणतो. तुला मात्र आता आपली जन्मभूमी सोडून माझ्याबरोबर आलं पाहिजे. तो रत्नजडित बाण मला आणून दे. बाबांची परवानगी घे. आणि लगेच माझ्याबरोबर चल' असे शृंगभुजाचे बोलणे ऐकून रूपशिखा म्हणाली, 'महाराज, आता आपण जिथं, तिथंच मी असणार. सुस्त्रियांना पतिवाचून अन्य गती नसते. आपण इथून जायचं हे बाबांना कळता उपयोगाचं नाही. ते फार रागीट आहेत. ते आपल्याला मुळीच परवानगी देणार नाहीत. तेव्हा त्यांच्या नकळत आपण इथून गेलं पाहिजे. त्यांना कळल्यावर ते जर आपला पाठलाग करू लागले तर मी आपल्या विद्यासामर्थ्यानं त्यांना परतवून लावीन.' असे रूपशिखेचे बोलणे ऐकून शृंगभुज आनंदित झाला.

दुसऱ्या दिवशी रूपशिखेने मूल्यवान रत्नांबरोबर रत्नजडित बाणही शृंगभुजास आणून दिला. नंतर 'आम्ही बागेकडे फिरण्यास जात आहो' असे सेवकांना सांगून शृंगभुज रूपशिखेसह तिच्याच 'शरवेग' नावाच्या घोड्यावर बसून मधुपुरातून बाहेर पडला. तो बराच दूर गेल्यावर अग्निशिखाला त्याच्या पलायनाचे वृत्त समजले. तेव्हा तो अतिशय संतापून शृंगभुजाचा पाठलाग करण्यास निघाला. त्याच्या जलद गतीने येण्याचा आवाज कानी पडताच रूपशिखा शृंगभुजाला म्हणाली, ''महाराज, माझे बाबा आपल्याला परत नेण्याकरिता येत आहेत. पण मी त्यांना आपल्या विद्येने कसे फसविते ते तुम्ही निमूटपणे पहा.'' असे म्हणून तिने आपल्या विद्यने घोड्यासह शृंगभुजाला झाकून टाकले. नंतर घोड्यावरून उतरून तिने पुरुषवेष घेतला. त्यावेळी तिथे आलेल्या एका गरीब लाकूडतोड्याला ती म्हणाली, 'अरे बाबा, एक भयंकर

राक्षस इकडे येत आहे. तुझी कुऱ्हाड मला देऊन तू इथेच मुकाट्याचं थांब. तो राक्षस गेला म्हणजे मी तुझी कुऱ्हाड तुला परत देईन.' लाकूडतोड्याने कुऱ्हाड देताच रूपशिखा लाकडे तोडू लागली. तितक्यात तिथे अग्निशिख आला. आणि म्हणाला, "काय रे बाबा, एक तरुण पुरुष एका स्त्रीसह या वाटेने गेला काय ?" तेव्हा थोडी कष्टी होऊन पुरूषवेष धारण केलेली रूपशिखा म्हणाली, "नाही रे बाबा, या वाटेने कोणीही गेले नाही. राक्षसांचा राजा अग्निशिख आज दिवंगत झाला. त्याच्या दहनाकरिता आम्ही लाकूडतोड करीत आहोत."

असे रूपशिखेचे शब्द ऐकून तो मूर्ख राक्षस स्वतःशी म्हणाला, "खरंच मी मेलो काय ? मग रूपशिखेला घेऊन काय करायचं ! आता परत जातो, नि मी आपल्या सेवकांना विचारून खात्री करून घेतो.' असे म्हणून तो मूर्ख परत फिरला. व रूपशिखा शृंगभुजासह पुढे प्रवास करू लागली. तिकडे नगरात जाऊन अग्निशिखाने सेवकांना विचारून आपण जिवंत आहोत अशी खात्री करून घेतली. मग आनंदित झालेला तो मठ्ठ राक्षस पुन्हा रूपशिखेचा पाठलाग करण्यास सत्वर निघाला. दुरूनच तो येत असल्याचे ओळखून पुन्हा रूपशिखा घोड्यावरून खाली उतरली. तिने शृंगभुजाला घोड्यासह आपल्या विद्येने अदृश्य केले. तेवढ्यात तेथून जाणाऱ्या दूताच्या हातचे पत्र घेऊन ती स्वतः दूत बनली. तितक्यात मूर्ख अग्निशिख तिथे आला. त्याने विचारले, 'या मार्गाने एक तरूण पुरूष एका स्त्रीसह गेलेला तू पाहिलास काय ?' तेव्हा पुरुषवेषातली रूपशिखा म्हणाली, 'मी कोणालाही पाहिले नाही. मी एका महत्वाच्या कामाकरिता जात आहे. अग्निशिखाला त्याच्या शत्रूने लढाईत मारले. आपल्या भावाला बोलावून त्याच्या हवाली आपले राज्य करावे म्हणून त्याचे प्राण कंठी अडलेले आहेत. म्हणून त्याचे पत्र घेऊन आम्ही धूमशिखाकडे निघालो आहोत !"

ते ऐकून तो मठ्ठ राक्षस पुन्हा घाबरला व स्वतःशी म्हणाला, "मला शत्रूंनी मारले हे खरंच आहे का ?' असे म्हणून खरे काय ते जाणून घेण्याकरिता तो पुन्हा आपल्या नगराकडे गेला. तेथे आपण जे ऐकले ते खोटे व हास्यास्पद आहे असे त्याला समजले. तो रूपशिखेला विसरला. आणि पुन्हा नगराबाहेर पडला नाही. तिकडे रूपशिखेने पुरुषवेष टाकून स्त्रीवेष धारण केला. आणि

ती आपल्या पतीबरोबर त्याच्या राजधानीस निघाली.

नंतर शृंगभुज तिच्यासह निर्विघ्नपणे वर्धमानपुरास गेला. तो सपत्निक आला आहे असे कळताच आनंदित झालेल्या वीरभुजाने आपल्या डोळ्यातील आनंदाश्रू आवरून त्याचे आपल्या पित्याला वंदन केले. तेव्हा वीरभुज शृंगभुजाला म्हणाला, 'बाळा, मला सोडून तू इतके दिवस कुठ गेला होतास ?' तेव्हा शृंगभुजाने सुरूवातीपासून घडलेली सर्व हकीकत राजाला सांगितली आणि त्याच्या समक्ष आपल्या सावत्र भावांना बोलावून रत्नजडित बाण त्यांस दिला.

निरपराधी शृंगभुजाचा द्वेष करणाऱ्या आपल्या दुष्ट पुत्रांनी रचलेले कपटी कारस्थान राजाने त्यांना शिक्षा करण्याचे ठरविले. त्याच वेळी त्याला वाटले, निरपराधी गुणवरेच्या बाबतीही असाच अन्याय झाला असावा. त्याने चौकशी केली. तेव्हा गुणवरेचा विनाकारण द्वेष करणाऱ्या अयशोलेखा आदी राण्यांनी तिच्याविषयी खोटेनाटे सांगून आपले मन कलुषित केले होते असे राजाला आढळून आले. मग लगेच त्याने गुणवरेची अंधारकोठडीतून मुक्तता केली. व तिला मोठ्या सन्मानाने राजवाड्यातल्या अंतःपुरात आणले.

नंतर शृंगभुज रूपशिखेसह आपल्या आईला भेटला. त्या दोघांनी तिला वंदन केले. मग पित्याच्या आज्ञेवरून शृंगभुजाने आपली व रूपशिखेने केलेल्या उपकारांची सविस्तर हकीकत सांगितली. तेव्हा गुणवरा म्हणाली, 'पुत्रा, या रूपशिखेनं आपले प्राण, नातलग, आपला देश या तिन्ही प्रिय गोष्टींचा त्याग करून तुझ्या त्या गोष्टी तुला परत मिळवून दिल्या आहेत. तिच्या उपकारांचं मोल करणं अशक्य आहे. खरोखर आपण भाग्यवंत म्हणून देवत्वाचा अंश असलेली ही रूपशिखा तुला पत्नी व आम्हाला सून म्हणून लाभली.'

नंतर राजाने गुणवरेचा मत्सर करून तिच्या हालास कारणीभूत झालेल्या आपल्या दुष्ट राण्यांना बोलावून घेतले. आणि त्यांना तळघरात कोंडून ठेवण्याची आज्ञा केली. पण उदार मनाच्या गुणवरेने राजाची नम्रपणे प्रार्थना करून आपल्या सवतींची त्या दुःखातून सुटका केली. त्याचप्रमाणे शृंगभुजाला कायमचे दूर करावे म्हणून कपटी कारस्थान केलेल्या आपल्या दुष्ट पुत्रांना

राजाने तीर्थयात्रेच्या निमित्ताने राज्याबाहेर जाण्याची आज्ञा केली. पण शृंगभुजाच्या प्रार्थनेवरून राजाने त्यांना क्षमा केली.

पुढे वयाने लहान पण गुणांनी थोर अशा शृंगभुजास राजाने युवराजपद दिले. यथावकाश शृंगभुज दिग्विजयी होऊन परत आला. आणि आपल्या मातापित्यांना व प्रजेला सुखी करीत रूपशिखेसह मोठ्या आनंदात कालक्रमणा करू लागला

# विद्याप्राप्तीचा मार्ग

प्रतिष्ठान नगरात एक विप्र राहात होता. त्याचे नाव होते तपोदत्त. तपोदत्ताचे वडील विद्यासंपन्न होते. लहानपणी ते तपोदत्ताला शिकविण्यास जवळ घेऊन बसत. पण त्याचे विद्याभ्यासाकडे लक्षच नसायचे. लक्ष देऊन विद्याभ्यास केला नाही तर विद्या कशी येणार ? तसाच तपोदत्त लहानाचा मोठा झाला. तेव्हा अविद्वान म्हणून लोक त्याची हेटाळणी करू लागले. त्याचा तिरस्कार करू लागले. तेव्हा चारचौघा विद्वानात बसून बोलण्याची तपोदत्तला लाज वाटू लागली. त्याने विचार केला, आता आपण खूप तप करून विद्या प्राप्त करून घ्यावी.

असा विचार करून तपोदत्त घराबाहेर पडला. प्रवास करीत करीत तो गंगेच्या काठी पोहोचला. तेथे राहून तो मूर्ख विद्याप्राप्तीसाठी उग्र तप करू लागला. पण व्यर्थ! उग्र तप करणाऱ्या तपोदत्ताला त्याच्या तपाच्या निरूपयोगाची जाणीव द्यावी या उद्देशाने देवेन्द्र ब्राह्मणाचे रूप धारण करून तपोदत्ताजवळ गेला. तेथे गंगेच्या काठी बसून तो तपोदत्ताच्या डोळ्यासमोर जवळ असलेली वाळू आपल्या मुठीत घेऊन ती तो गंगेच्या प्रवाहात वारंवार फेकू लागला. हे त्याचे कार्य बराच वेळ चाललेले पाहून आश्चर्यचकित झालेल्या तपोदत्ताने आपले मौन सोडले आणि त्या ब्राह्मणवेषधारी देवेन्द्रास विचारले, "भल्या गृहस्था, हे तू काय करीत आहेस ?" तेव्हा देवेन्द्र म्हणाला, "अहो मुनिवर्य, लोकांच्या सुखसोयीकरिता मी गंगेवर पूल बांधण्याचे काम करीत आहे !"

असे त्या ब्राह्मणवेषधारी देवेन्द्राचे शब्द ऐकताच तपोदत्त उपहासाने हसून म्हणाला, "किती मूर्ख आहेस तू ! तू मुठीमुठीने पाण्याने टाकलेली वाळू प्रवाहाबरोबर वाहून चालली आहे. तशा त्या वाळूचा पूल कधीतरी बांधता येईल काय ?" तेव्हा देवेन्द्र हसून म्हणाला, " हे जर तुला कळतं तर गुरूचे अध्यापन

व स्वतःचे लक्षपूर्वक अध्ययन, वाचन, पठण यांच्याशिवाय केवळ व्रते, उपवास अशा प्रकारचे तप करून तू विद्या प्राप्त करून घेण्यास कसा तयार झाला आहेस ? तशा प्रकाराने विद्येची कधीच प्राप्ती होत नाही. न शिकता विद्याप्राप्तीची इच्छा करणे म्हणजे अक्षरओळख नसता ग्रंथकर्ता होण्याची किंवा सशाचे शिंग प्राप्त करून घेण्याची इच्छा करण्यासारखे आहे. विद्याप्राप्ती एवढी जर सोपी असती तर कोणीही कधीच शिकले नसते !"

देवेन्द्राचा असा चांगला उपदेश तपोदत्ताला पटला. आणि तपाचा त्याग करून शिकून विद्यावंत होण्यासाठी तो आपल्या घराकडे गेला.

बुद्धिवंताला केलेल्या सदुपदेशाचा नेहमीच उपयोग होतो.

# दैवाने दिले, कर्माने नेले

कोणे एके काळी पाटलीपुत्र नगरात शुभदत्त नावाचा एक गरीब मनुष्य राहात होता. तो दररोज आपली कुऱ्हाड घेऊन रानात जायचा. तेथे लाकूडतोड करायची, तोडलेली लाकडे गोळा करायची, त्यांची मोळी बांधायची आणि ती नगरात नेऊन विकायची. मोळी विकून जे काही द्रव्य मिळेल तेवढ्यावर त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चाले.

एकदा काय झाले, शुभदत्त लाकूडतोड करण्याकरिता रानात खूप दूर गेला. तेव्हा तेथे त्याला दिव्य वस्त्रालंकारांनी सजलेले असे चार यक्ष दिसले. त्या यक्षांना पाहताच शुभदत्त भीतीने थरथर कापू लागला. तेवढ्यात त्या यक्षांचे त्याच्याकडे लक्ष गेले. ते शुभदत्ताजवळ आले, आणि मोठ्या प्रेमळपणे त्यांनी त्याला विचारले, 'तू कोण ? येथे का आलास ?' असे त्या यक्षांचे प्रेमळ शब्द ऐकताच त्याला धीर येऊन त्याने आपली सर्व हकीकत यक्षांना सांगितली. ती ऐकून दरिद्री शुभदत्ताची त्या यक्षांना दया आली व ते त्याला म्हणाले, 'भल्या माणसा, तू आमचा सेवक म्हणून येथे आमच्याजवळ रहा. तुझ्या उदरनिर्वाहाची जबाबदारी आम्ही घेऊ !'

असे ते यक्षांचे बोलणे ऐकून शुभदत्त म्हणाला, 'फार बरं झालं. तुमचे या गरीबावर फार मोठे उपकार होतील !' असे म्हणून शुभदत्त त्या यक्षांजवळ राहिला. त्याने त्यांच्या स्नानादि सर्व कर्मांची व्यवस्था केली. पुढे जेवणाची वेळ झाली तेव्हा ते यक्ष शुभदत्ताला म्हणाले, 'समोर भद्रघट ठेवलेला आहे. त्यातून जेवणाचे पदार्थ काढून घेऊन ते आमच्या पानावर वाढ !' तेव्हा शुभदत्त भद्रघटाकडे गेला. त्याने वाकून पाहिले. पण त्यात त्याला काही दिसले नाही. असे पाहून तो मुकाट्याने बसला. तेव्हा यक्ष हसून म्हणाले, 'शुभदत्ता, तुला खरंच काही ठाऊक नाही. म्हणून तू असा स्वस्थ बसलास. ऊठ. त्या घटात हात घाल. म्हणजे तुला जे हवं ते त्यातून मिळेल, हा घट साधासुधा नाही तर इच्छिलेले पदार्थ देणारा आहे !'

असे त्या यक्षांचे शब्द ऐकून शुभदत्त पुन्हा त्या घटाजवळ गेला. आणि त्याने त्यात हात घातला. तो काय आश्चर्य ! खाण्यापिण्याचे सर्व रूचकर पदार्थ त्याला त्यात मिळाले. या गोष्टीचे नवल करीतच त्याने त्या यक्षांना पोटभर जेऊ घातले. नंतर तो स्वतःही पोटभर जेवला. अशा रीतीने त्या यक्षांविषयी भीती वाटत असलेल्या शुभदत्ताने त्या यक्षांची सेवा करीत बरेच दिवस तिथे घालविले. शुभदत्ताच्या घरातील माणसे त्याच्याविषयी काळजीने कष्टी झाली होती. पण यक्षांनी त्यांना स्वप्नात काही आशादायक आदेश दिल्यामुळे ती शुभदत्ताची वाट पाहात राहिली होती.

शुभदत्ताने त्या यक्षांची महिना दीड महिना सेवा केल्यानंतर एके दिवशी ते चारही यक्ष शुभदत्ताला म्हणाले, 'आम्ही तुझ्या एकनिष्ठ सेवेने संतुष्ट संतुष्ट झालो आहोत. आम्ही तुझ्यावर प्रसन्न आहोत. तेव्हा तुला जे हवे ते तू मागून घे !' असे त्या यक्षांचे शब्द ऐकून आनंदित झालेला शुभदत्त म्हणाला, 'मला दुसरे तिसरे काही नको. फक्त हा भद्रघट तुम्ही मला द्या.' तेव्हा ते यक्ष त्याला म्हणाले, 'भल्या माणसा, तू या भद्रघटाची योग्य रीतीने काळजी घेऊ शकणार नाहीस. या भद्रघटाबद्दलची एक विशेष गोष्ट अशी की, तो फुटला म्हणजे पळून जातो. म्हणून त्याच्याशिवाय दुसरे तुला काय हवे मागून घे.' शुभदत्ताला तो भद्रघटच पाहिजे होता. म्हणून तो काहीच न बोलता निमूट बसला. तेव्हा भद्रघटाशिवाय त्याला दुसरे काही नको हे ओळखून यक्षांनी तो भद्रघट शुभदत्ताच्या हाती दिला. तेव्हा अतिशय हर्षित झालेल्या शुभदत्ताने त्या यक्षांना वंदन केले आणि भद्रघटासह तो आपल्या घराकडे परतला.

त्याला सुखरूप परत आलेला पाहताच घरातील सर्व माणसांना फार आनंद झाला. नंतर शुभदत्ताने त्या घटात हात घालून हवे ते खाद्यपेयादि पदार्थ बाहेर काढले. आणि घरातील सर्व माणसांना पोटभर जेऊ घातले. तो दिव्य भद्रघट सुरक्षित रहावा म्हणून शुभदत्ताने त्याला दुसऱ्या एका मोठ्या भांड्यात ठेवून दिले. अशा प्रकारे शुभदत्ताचे आणि त्याच्या घरच्या मंडळींचे काही दिवस मोठ्या मजेत गेले. मनुष्याला विनायासाने सुखसंपत्ती प्राप्त झाली म्हणजे तो अविचारी बनून व्यसनांच्या जाळ्यात सापडतो. शुभदत्ताचे तसेच झाले. त्याला

मद्यप्राशन करण्याचे व्यसन लागले. विनाशका जवळ आला म्हणजे माणसाची बुद्धी विपरीत होते.

एके दिवशी शुभदत्ताने जास्त प्रमाणात मद्यपान केले. त्याच्या धुंदीत तो बडबडू लागला असता त्याच्या नातलगांनी 'तुला हा भद्रघट कसा मिळाला ?' म्हणून विचारले. तेव्हा त्या मूर्ख माणसाने भद्रघटप्राप्तीची सर्व हकीकत त्यांना सांगितली. नंतर त्या दिव्य भद्रघटाला आपल्या खांद्यावर घेऊन तो मोठ्या ताठ्यात नाचू लागला. पण मद्यपानाच्या धुंदीमुळे नाचता नाचता त्याचा पाय घसरला. त्या क्षणी त्याच्या खांद्यावर असलेला दिव्य भद्रघट धाडकन् जमिनीवर पडला. व त्याचे तुकडे झाले. दुसऱ्या क्षणी इकडे तिकडे उडालेले तुकडे एकत्र झाले. त्यांचा होता तसाच पुन्हा भद्रघट तयार बनला. आणि पळत तो उघड्या दारातून बाहेर पडून दिसेनासा झाला. ते पाहून खाडकन् शुद्धीवर आलेला शुभदत्त अत्यंत कष्टी झाला, त्याच्या दैवाने त्याला जे दिले होते ते त्याच्या कर्माने नेले.

दुसऱ्या दिवशी पुन्हा आपल्या हाती कुऱ्हाड घेऊन शुभदत्त लाकूडतोड करण्याकरिता् रानाकडे निघाला.

२८८६ ३१।३।८४
०११.०१

# देव तारी त्याला कोण मारी

कोणे एके काळी हर्षपूर नावाच्या नगरात समुद्रशूर नावाचा एक व्यापारी राहात होता. तो खूप श्रीमंत तसाच धर्मशीलही होता. व्यापाराच्या निमित्ताने तो एकदा नौकेतून सागरपार असलेल्या सुवर्णद्वीपाकडे निघाला. त्याचा निम्मा अधिक जलप्रवास सुखाचा झाला. पण सुवर्णद्वीप थोड्याच अंतरावर राहिले असता आभाळ काळ्याभोर मेघांनी व्यापिले. जोराचा वारा सुटला. त्यामुळे समुद्र खवळला. उंच लाटांच्या प्रहारांनी नौका समुद्रात खाली वर फेकली जाऊ लागली. काही क्षणातच तुफान वृष्टी सुरू झाली. मुसळधार पाऊस पडू लागला. तशा त्या भयंकर वेळीच समुद्रातल्या एका मोठ्या माशाने डळमळणाऱ्या नौकेला आपल्या शेपटीचा एक जबरदस्त तडाखा दिला. त्यामुळे ती दुर्दैवी नौका फुटली आणि पाण्यात बुडाली.

नौकेवरून समुद्रात फेकला गेलेला समुद्रशूर पाण्यात पडताच पोहू लागला. लाटांशी झुंजत मोठ्या कष्टाने पोहत तो पुढे निघाला. तेव्हा त्याच्या हाताला एक मृत देह लागला. त्याचा आधार समुद्रशूराने घेतला. काही वेळाने वादळ थांबले, पाऊस थांबला आणि समुद्र शांत झाला. समुद्रशूर मृत देहाच्या आधाराने सुवर्णद्वीपाजवळ येऊन पोहोचला. त्याने किनाऱ्यावर पाय ठेवताच घट्ट गाठ मारलेले मृत देहाच्या कमरेवरचे वस्त्र त्याला दिसले. त्या वस्त्राची गाठ त्याने सोडली. तोच त्यात असलेल्या एका दिव्य रत्नहाराने त्याचे डोळे दिपले. त्या रत्नहारातील रत्ने अतिशय मौल्यवान होती. असा रत्नहार अनायासे हाती आल्यामुळे आपले सर्वस्व समुद्रात गडप झाल्याची खंत समुद्रशूराला वाटली नाही.

नंतर समुद्रस्नान करून समुद्रशूर सुवर्णद्वीपाच्या दिशेने चालू लागला. काही वेळाने तो कलशपूर नावाच्या नगरास पोहोचला. नगरात प्रवेश करताच त्याला जवळच एक मंदिर दिसले. प्रवासाच्या दगदगीने फार थकल्यामुळे आता

थोडी विश्रांती घ्यावी अशा विचाराने समुद्रशूर त्या मंदिरात गेला. मंदिरातल्या शीतल ओवरीत थोडा वेळ बसताच त्याला तिथेच गाढ झोप लागली.

काही वेळाने दोन नगररक्षक त्या मंदिरात आले. ओवरीत कोण झोपले आहे ते पाहण्यासाठी ते समुद्रशूराजवळ गेले. तो त्याच्या हातातील रत्नहार त्या नगररक्षकांना दिसला. आपल्या चक्रसेना राजकन्येचा गळ्यातील चोरीला गेलेला रत्नहार हाच आहे अशी त्यांची खात्री होताच त्यानी चोर समजून समुद्रशूरच्या मुसक्या बांधल्या आणि त्याला राजासमोर नेऊन उभे केले. 'तूच राजकन्येचा रत्नहार चोरलास ना ?' असा राजाने प्रश्न करताच समुद्रशूराने घडलेली सर्व हकीकत सांगितली. पण संतप्त झालेल्या राजाला ती खरी वाटली नाही. 'हा चोर शिरजोरपणे खोटं बोलत आहे. हा बघा त्याच्याजवळ सापडलेला रत्नहार !' असे म्हणून राजा तो रत्नहार दरबारी मंडळीस दाखवीत आहे तोच एक भली मोठी घार तिथे आली आणि तो झगमगणारा रत्नहार घेऊन बघता बघता दूर निघून गेली.

पण राजाने समुद्रशूरावर चोरीचा आरोप ठेवून त्याला मृत्यूची शिक्षा दिली. त्याप्रमाणे राजसेवक समुद्रशूराला वध स्तंभाकडे नेऊ लागले. तेव्हा तो बिचारा मुक्तकंठाने रडू लागला. आता या प्राणसंकटातून श्री शंकरच आपली सुटका करतील अशा दृढ विश्वासाने त्याने श्रीशंकराची मनोभावे प्रार्थना करण्यास आरंभ केला. तेव्हा आकाशवाणी झाली, ' हे राजा, हर्षपुराहून तुझ्या नगरात आलेला व्यापारी समुद्रशूर निरपराधी आहे. त्याचा वध करू नकोस. तुझ्या मुलीचा हार चोरणारा चोर नगररक्षकाच्या भीतीने समुद्रात पडून मरण पावला. त्याच्याच मृत देहाचा आधार घेऊन, नौका फुटून निराधार झालेला समुद्रशूर किनाऱ्यावर आला. तेव्हा त्या चोराच्या कमरेस असलेल्या वस्त्रात बांधलेला रत्नहार त्याला सापडला. समुद्रशूर सज्जन व धर्मशील आहे. तेव्हा त्याला न मारता, सन्मानाने मुक्त कर!'

अशी आकाशवाणी ऐकताच राजाने तत्काळ समुद्रशूराला बंधमुक्त केले. नंतर त्याचा सत्कार करून राजाने त्याला पुष्कळ द्रव्य दिले आणि परत हर्षपुरास जाण्यास सांगितले. तेव्हा व्यापाऱ्यांच्या एक तांड्याबरोबर नौकेतून

सुखरूपपणे जलप्रवास करून समुद्रशूर समुद्राच्या पैलतीरी पोहोजला. नंतर सर्व व्यापाऱ्यांसह हर्षपुरास निघाला.

एके दिवशी संध्याकाळी तो व्यापाऱ्यांचा तांडा रात्रीच्या वस्तीकरिता एका अरण्यात उतरला. पण दुर्दैवाने त्याच रात्री चोरांच्या एका टोळीने त्या तांड्यावर हल्ला केला. तेव्हा तेथे मोठा हलकल्लोळ उडाला. त्याचा फायदा घेऊन जिवाच्या भीतीने आपले सर्व धन तेथेच टाकून समुद्रशूर पळाला आणि जवळच असलेल्या एका वडाच्या झाडावर चढून बसला. त्याच्या डोळ्यादेखत त्या दुष्ट चोरांनी व्यापारांना मारून सर्व द्रव्य लुटून नेले. चोरांच्या भीतीने समुद्रशूराने ती रात्र झाडावरच जागून काढली.

सकाळ झाली. चहूकडे लख्ख प्रकाश पडला. तेव्हा आता कोठे जावे, काय करावे असा समुद्रशूर विचार करू लागला. तोच त्याची नजर झाडाच्या मागील बाजूच्या गर्द पानात दिव्याच्या ज्योतीप्रमाणे चमकणाऱ्या एका प्रकाशाने खेचून घेतली. तो प्रकाश कशाचा ते बघण्यासाठी तो फांदीवरून सरकत तिकडे गेला. तेव्हा तिथे त्याला एक घारीचे घरटे दिसले. त्या घरट्यात समुद्रशूराला पुष्कळ मौल्यवान अशी नानाप्रकारची रत्ने आढळली. एवढेच नव्हे तर सुवर्णद्वीपाच्या राजाच्या हातातून पळविलेला रत्नहार देखील त्याला त्या घरट्यात आढळला. आपले जेवढे द्रव्य गेले त्याच्या पेक्षा असंख्य पटींनी जास्त द्रव्य रत्नांच्या रूपाने आपणास प्राप्त झाले म्हणून अतिशय आनंदित झालेल्या समुद्रशूराने त्या घरट्यातून हारासह सर्व रत्ने काढून घेतली. आणि परमेश्वराचे आभार मानीत तो झाडावरून खाली उतरला. नंतर निर्विघ्नपणे प्रवास करून समुद्रशूर हर्षपुरास पोहोचला. व आपल्या सर्व कुटुंबियांसमवेत मोठ्या सुखाने राहू लागला.

समुद्रशूरावर त्याच्या प्रवासात किती संकटे आली ! पण परमेश्वरावरील विश्वास आणि धैर्य त्याने कधीही सोडले नाही. त्याच्यावरील एक एक कठीण प्रसंग किती भयंकर होता ! समुद्रात बुडणे, समुद्र सुखरूपणाने तरून जाणे, रत्नहाराची प्राप्ती होणे, चोरीचा आरोप येऊन मृत्यूची शिक्षा होणे, आकाशवाणीमुळे त्यातून मुक्तता मिळून राजसत्कारासह धन मिळणे, चोरांचा हल्ला होऊन धन चोरीला जाणे आणि अखेर अमूल्य रत्नांसह रत्नहाराची प्राप्ती

होणे, अशा क्रमाने तो विविध सुखदुःखातून पार पडला. विधिलिखित विलक्षण असते हेच खरे. पण जो पुण्यशील असतो तो मोठी दुःखे सोसूनही अखेर सुखात नांदतो.

# वीरवराची स्वामिनिष्ठा

वि क्रमपूर नावाचे एक नगर होते. विक्रमतुंग त्या नगराचा राजा होता. तो मोठा शूर, उदार व धर्मशील होता. अशा त्या राजाकडे एके दिवशी मालव देशातील एक देखणा तरुण आला. त्याच्या कंबरेला तलवार व एका हातात ढाल होती. तो तरुण राजाला म्हणाला, 'महाराज, आपली सेवा करण्याकरिता मी मालव देशातून आलो आहे. माझं नाव वीरवर. अहोरात्र राजद्वारावर उभा राहून मी खडा पहारा करीन. आपण मला दररोज पाचशे दीनार द्या !' असे त्या तरुणाचे बोलणे ऐकून राजाने विचार केला, 'हा तरुण तर मोठा तेजस्वी दिसतोय. त्याचं मागणं मान्य करून त्याच्या अंगी कोणते विशेष सद्‌गुण आहेत ते तरी पाहू या.' अषा विचाराने राजाने वीरवराची विनंती मान्य केली. तो निघून गेल्यावर राजाने आपल्या चार गुप्त हेरांना बोलावून घेतले आणि वीरवर पाचशे दीनार कसे खर्च करतो ते पाहण्याची त्यांना आज्ञा केली.

ठरल्याप्रमाणे वीरवराची राजसेवा सुरू झाली. त्याच्या कुटुंबात त्याची पत्नी धर्मवती, कन्या वीरवती व मुलगा सत्ववर अशी तीन माणसे होती. वीरवराला दररोज जे पाचशे दीनार मिळत त्यापैकी शंभर तो घरखर्चासाठी धर्मवतीला देई, शंभर वस्त्रे, फुले इत्यादि साहित्य खरेदीला खर्च करी, शंभर हरिहरादि देवतांच्या पूजेप्रीत्यर्थ उपयोगात आणी, आणि उरलेले दोनशे दीनार तो ब्राह्मण, गोरगरीब यांना म्हणून देऊन टाकी. एवढा रोजचा नित्यक्रम आटोपला म्हणजे तो अहोरात्र राजद्वारी सशस्त्र उभा राहून पहारा करी. असा वीरवराचा दैनंदिन कार्यक्रम गुप्त हेरांनी राजाला सांगताच त्याला फार समाधान वाटले आणि आता वीरवरावर पाळत ठेवू नका असे राजाने त्यांना सांगितले.

पुढे पावसाळा सुरू झाला. भर पावसात सुद्धा वीरवर राजद्वारापासून बाजूला सरकला नाही. एके दिवशी धुवांधार पाऊस बरसू लागला. तेव्हा

वीरवराची कसोटी पाहण्याकरिता राजवाड्याच्या वरच्या मजल्यावरून राजाने मोठ्यांदा विचारले, 'राजद्वारी कोण उभे आहे?' 'मी वीरवर!' वीरवराने तत्काळ उत्तर दिले. तेव्हा आश्चर्यचकित झालेला राजा स्वतःशी म्हणाला, 'धन्य आहे या वीरवराची! एवढा मुसळधार पाऊस कोसळत असताना सुद्धा तो आपल्या जागेवरून तसूभरही हलला नासही. खरंच, तो धैर्यवान तरुण एखादे उच्चपद भूषविण्यास अगदी योग्य आहे!'

असे राजा स्वतःशी बोलत आहे तोच दूर कुठे तरी मोठ्यांदा रडत असलेल्या एका स्त्रीचा आवाज कानी पडला. त्या करुण आवाजाने राजाचे हृदय व्याकुळ केले. ' माझ्या राज्यातून दुःख पळून गेले असताना एवढ्या मध्यरात्री ही कोण स्त्री रडत आहे त्याचा तपास केलाच पाहिजे,' असा विचार करून राजा वीरवरास म्हणाला, 'वीरवार, दूरवर कोण स्त्री मोठ्यांदा रडत आहे ते पहा. ती स्त्री कोण व का रडते हे तिला विचारून तसे मला येऊन सांग!' 'जशी महाराजांची आज्ञा!' असे म्हणून धाडसी वीरवर आपल्या हातातील ढाल व तलवार सरसावून ज्या दिशेने स्त्रीच्या रडण्याचा आवाच ऐकू येत होता तिकडे निघाला.

मेघांचा गडगडाट व विजांचा चकचकाट यांच्यासह मुसळधार पर्जन्यवृष्टी होत असताना एवढ्या मध्यरात्री वीरवरास एकटे जाऊ देणे त्या दयाशील राजाला बरे वाटेना. तो देखील आपली ढाल व तलवार घेऊन राजद्वारातून बाहेर पडला आणि गुपचुपपणे वीरवराच्या मागून निघाला. रडण्याच्या आवाजाचा माग काढीत वीरवर एका मोठ्या सरोवराच्या काठी आला. तिथे, त्याला 'नाथा, तुमच्याशिवाय मी कशी जिवंत राहू?' असे म्हणत मोठ्यांदा आक्रोश करणारी एक स्त्री दिसली. तिच्यापाशी जाऊन वीरवराने तिला विचारले, 'हे कल्याणी, तू कोण? कोणासाठी व का रडत आहेस?'

तेव्हा ती स्त्री म्हणाली, 'वत्सा, मी पृथ्वी आहे. सध्या माझा नाथ उदार, धर्मशील असा विक्रमतुंग राजा आहे. तो आजपासून तिसऱ्या दिवशी मृत्यू पावणार आहे. तसा पती मला पुन्हा मिळणार नाही, म्हणून मी दुःखावेगानं रडत आहे. दिव्य दृष्टीमुळं मला पुढं घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टी दिसतात.' असे पृथ्वीचे शब्द ऐकून वीरवर म्हणाला, 'देवी, राजाच्या जिवावरचं गंडांतर टळेल



असा काही उपाय असेल तर तो मला सांग.' तेव्हा पृथ्वी म्हणाली. 'आहे. एक उपाय आहे. तू मनात घेतला तर !' 'अस्सं !' आनंदित होऊन वीरवर म्हणाला, 'देवी, तो उपाय मला लवकर सांग. माझ्या किंवा माझ्या कुटुंबाच्या प्राणांनी जर राजाच्या जिवावरचं संकट टळत असेल तर माझं जीवन धन्य झालं असं मला वाटेल !'

असे त्या वीर वीरवराचे धैर्यशाली शब्द ऐकून पृथ्वी म्हणाली, 'चंडिकादेवीला तू आपल्या सत्त्ववर मुलाचा जर बळी देशील तर राजा जिवंत राहील. हाच एकमेव उपाय आहे.' ठीक आहे,' वीरवर म्हणाला, 'घरी जाऊन मी आताच तो उपाय अमलात आणतो.' असे म्हणून पृथ्वीला नमस्कार करून वीरवर निघाला. "तूच आपल्या स्वामीचे कल्याण करशील. जा. देव तुझं भलं करो !" असे म्हणून पृथ्वीही अदृश्य झाली. वीरवराच्या पाठीमागून गुपचुपपणे आलेल्या राजाने वीरवर व पृथ्वी यांचा संवाद ऐकला. तेव्हा प्रथम तो विस्मित झाला आणि नंतर फार कष्टी झाला.

घरी येताच वीरवराने आपल्या पत्नीला घडलेली सर्व हकीकत सांगितली. तेव्हा ती म्हणाली, 'आपल्या अन्नदात्यांचं कल्याण करणं आपलं

कर्तव्यच आहे.' असे म्हणून तिने वीरवराने योजिलेल्या उपायास संमती दिली. नंतर वीरवराने आपल्या देखण्या, सद्गुणी व आवडत्या सत्ववर मुलास झोपेतून जागे केले. आणि डोळ्यातून पाझरणारी आसवे कशीबशी आवरीत, भरल्या कंठाने त्याला सर्व हकीकत सांगितली. तेव्हा निर्भय व धैर्यशाली सत्ववर आपल्या वडिलांस म्हणाला, 'बाबा, स्वामीकार्यार्थ प्राणार्पण करण्याची ही संधी मला पूर्वजन्मीच्या पुण्याईनेच प्राप्त झाली आहे. अन्नदात्यांचं ऋण फेडलंच पाहिजे. आपण निःसंकोचपणे माझं शिरकमळ चंडीमातेच्या चरणी अर्पण करा!'

असे मृत्यूची पर्वा न करता सत्ववराने उच्चारलेले शब्द ऐकून वीरवराचे अंग शहारले. तो म्हणाला, 'सत्ववरा, खरंच तू माझा मुलगा शोभतोस!' असे म्हणून सत्ववराला खांद्यावर घेऊन वीरवर तडक घराबाहेर पडला. त्याच्यामागून धर्मवतीही आपल्या वीरवती कन्येला कडेवर घेऊन निघाली. आणि तिच्या मागून वीरवर कुटुंबियांच्या अलोट धैर्याने विस्मित झालेला विक्रमतुंगी!'

पण आणखी एक दुःखद घटना वीरवर उघड्या डोळ्यांनी बघत होता. आपल्या प्रिय भावाचा मृत्यू पाहून आक्रोश करणाऱ्या त्याच्या वीरवती मुलीने दुःखवेगाने प्राणत्याग केला. मुलाबरोबर मुलीचाही कायम वियोग झाला असे पाहून धर्मवती हात जोडून दीनवाणीने वीरवरास म्हणाली, 'नाथ, सत्ववराच्या बलिदानानं राजाचं कल्याण तर झालंच आहे. आता या माझ्या दोन्ही लाडक्यांसह मी अग्निप्रवेश करते. मला आज्ञा द्या, ही विनंती. भावावरील प्रेमानं या माझ्या लाडक्या लहान वीरवतीनं देहत्याग केला. तर दोन अपत्यांचा मृत्यू डोळ्यासमोर झाल्यावर आता मी तरी कशाला जिवंत राहू?'

प्रिय अपत्यांच्या मृत्यूमुळे उजाड झालेल्या संसारात जीवनाच्या अखेरपर्यंत दुःखाग्नीने जळत राहण्यापेक्षा खऱ्या अग्नीचा दाह एकदाच सहन करणे बरे अशा अर्थाने धर्मवतीचे म्हणणे योग्य आहे असे वीरवराला वाटले. त्याने मंदिराच्या एका बाजूस असलेल्या लाकडांच्या ढिगाऱ्यातून काही लाकडे आणून चिता रचली आणि ती पेटविली. तेव्हा धर्मवतीने आपल्या दोन लाडक्यांचे देह चितेवर ठेवले. नंतर वीरवराच्या पायावर डोके ठेवून ती

म्हणाली, 'परमेश्वरा, जन्मोजन्मी हाच पती मला प्राप्त होवो. आणि राजा चिरायु होवो.' असे म्हणून तिने शांत चित्ताने अग्निप्रवेश केला.

तेव्हा वीरवर स्वतःशी म्हणाला, 'आपल्या प्रिय पुत्राचा बळी देऊन मी आता माझ्या अन्नदात्याच्या ऋणातून मुक्त झालो आहे. राजाही शतायु होईल. मी मात्र माझ्या सर्व प्रिय जीवांचा नाश करून उजळ माथ्यानं जिवंत राहाणं योग्य नाही. नाहीतर मी स्वार्थी, निष्ठुर व कृतघ्न ठरून तसे जीवन मला कंठावे लागेल. तेव्हा देवी चंडिकेला स्वतःचाच बळी देऊन का तृप्त करू नये ?'

असे म्हणून आणि तसाच दृढ निश्चय करून धैर्यशाली वीरवर स्वपुत्राच्या रक्ताने माखलेली तलवार हाती घेऊन चंडिकेपुढे उभा राहिला. तिची मनोभावे स्तुती करून अखेर तो म्हणाला, 'देवी भगवती, मी तुझ्या चरणी स्वतःचं बलिदान करीत आहे. माझ्यावर प्रसन्न हो आणि माझ्या राजाचे चिरंतन कल्याण कर !' असे म्हणून स्वतःच्या मानेवर प्रहार करण्यासाठी वीरवराने तलवार वर उचलली तोच आकाशवाणी झाली, 'वत्सा, असे साहस तू करू नकोस. तुझ्या धैर्यानं मी प्रसन्न झाले आहे. आता तुला पाहिजे तो वर तू मागून घे !' तेव्हा वीरवर म्हणाला, 'माझ्या स्वामीला, राजा विक्रमतुंगाला आणखी शंभर वर्षे आयुष्य लाभो. आणि माझी प्रिय पत्नी, मुलगा व मुलगी ही जिवंत होवोत !' तेव्हा 'तथास्तु' असा शब्द उच्चारून आकाशवाणी मूक झाली. दुसऱ्या क्षणी वीरवराची भार्या धर्मवती, मुलगा सत्ववर व मुलगी वीरवती, ही तिघेही पूर्वीपेक्षा जास्त तेजस्वी देह धारण करून उठली. तेव्हा वीरवराला अवर्णनीय आनंद झाला. त्याने सर्वांसह देवीला वंदन केले. नंतर सगळ्यांना घेऊन तो आपल्या घराकडे परतला. घरी थोडा वेळ थांबून वीरवर पुन्हा राजद्वारी हजर झाला.

वरील सर्व घटना पाहून प्रथम आश्चर्यचकित मग कष्टी आणि नंतर अतिशय आनंदित झालेला राजा विक्रमतुंग, वीरवर राजद्वारी येऊन उभा राहण्यापूर्वीच राजवाड्यात येऊन आपल्या महालात बसला होता. वीरवर पुन्हा राजद्वारी येऊन उभा राहिल्याचे दिसताच त्याने विचारले, 'महाराज, मी आपला सेवक वीरवर आहे. आपल्या आज्ञेप्रमाणं रडणाऱ्या स्त्रीचा शोध घेतला. ती

कोणी देवी होती. मला पाहताच ती अदृश्य झाली.' असे वीरवराचे शब्द ऐकून राजा स्वतःशी म्हणाला, खरंच, वीरवर कुणी असामान्य पुरुष असला पाहिजे. माझ्यासाठी आपल्या सर्वस्वाचा महान त्याग करून त्यासंबंधी तो एक शब्दही बोलत नाही. किती गंभीर, विशाल हृदयाचा आणि महासत्ववान हा वीर पुरुष ! माझ्यावरील त्याच्या महान उपकारांची मी कशी भरपाई करू?' अशा विचारातच राजाने ती रात्र घालविली.

दुसऱ्या दिवशी राजसभेत कृतज्ञ राजा विक्रमतुंगाने गेल्या रात्री समक्ष पाहिलेली वीरवराच्या अलौकिक त्यागाची हकीकत सर्वांना सांगितली. ती ऐकून राजसभेतील सर्व सभासद विस्मित झाले. त्यांनी वीर वीरवराची मुक्त कंठाने प्रशंसा केली.

नंतर राजाने वीरवर व त्याचा मुलगा सत्ववर यांना मोठ्या सन्मानाने राजसभेत आणून उच्चासनावर बसविले. आणि त्यांना शेलापागोटे, अनेक गाव, हत्ती, घोडे व अपार द्रव्य देऊन त्यांचा भव्य सत्कार केला. एवढेच नव्हे तर राजाने वीरवराच्या वेतनात साठपट वाढ केली. त्याक्षणी वीरवर एखाद्या राजासारखा ऐश्वर्यशाली झाला.

अशा रीतीने स्वामीनिष्ठ वीरवराच्या महान त्यागाला सुफळ प्राप्त झाले.

# रंकाचा राव असा झाला

फार पूर्वी लक्षपूर नावाचे एक संपन्न नगर होते. त्या नगराचा लक्षदत्त नावाचा राजा शूर व मोठा उदार होता. राजद्वारी आलेल्या याचकास तो एक लक्ष रुपये देत असे. लक्षदत्ताबरोबर ज्या याचकाचे अल्पकाळ बोलणे होई त्याला तो पाच लक्ष रुपये देई. आणि ज्याच्यावर लक्षदत्त प्रसन्न होई त्याचे जन्मदारिद्र्य बारा वाटांनी पळून जात असे. असा त्या राजाचा फारच उदार स्वभाव असल्यामुळे लक्षदत्त या नावाने त्याला प्रसिद्धी मिळाली त्याच्या राजवाड्याच्या द्वारी लब्धदत्त नावाचा एक तरुण दरिद्री याचक वल्कल नेसून व जटाधारी बनून, ऊन्ह, थंडी, वारा, पाऊस यांची पर्वा न करता कित्येक दिवस उभा होता. लक्षदत्त त्याच्याकडे जाता येता पाही. पण हालअपेष्टा सोसत उभा राहिलेल्या लब्धदत्ताला त्याने काहीही द्रव्य दिले नाही.

एकदा लक्षदत्त शिकारीकरिता अरण्यात गेला. तेव्हा लब्धदत्तही हातात सोटा घेऊन राजाच्या मागोमाग गेला. अरण्यात राजा आपल्या सैन्यासह बाणांच्या वर्षावानी अनेक पशूंची शिकार करू लागला. ते पाहून, पायीच चालत आलेला लब्धदत्त पुढे झाला. आणि आपल्या हातातल्या केवळ सोट्यानेच तो रानडुकरे व हरिणे भुईसपाट करू लागला. त्याचे ते पराक्रमी कृत्य पाहून आश्चर्यचकित झालेला राजा स्वतःशी म्हणाला, 'बराच शूर दिसतो की तो जटाधारी !' एवढे बोलून सुद्धा राजाने लब्धदत्ताला काहीही द्रव्य दिले नाही. संध्याकाळी शिकारीहून परत आलेला श्रांत राजा राजवाड्यात गेला. आणि लब्धदत्त राजद्वारी पुन्हा आपल्या नेहमीच्या जागेवर जाऊन उभा राहिला.

पुढे काही महिन्यांनी सीमेवर गडबड करणाऱ्या शेजारच्या राजाचे पारिपत्य करण्याकरिता लक्षदत्त ससैन्य निघाला. तेव्हा त्याच्याबरोबर लब्धदत्तही हातातील सोट्यासह पायीच निघाला. सीमेवर पोहोचताच दोन्ही

सैन्यात घनघोर युद्ध सुरू झाले. त्या प्रसंगी लब्धदत्तही शत्रू सैन्यावर चालून गेला. आणि आपल्या हातातल्या सोट्याच्या प्रहारांनी त्याने राजाच्या समोर अनेक वीरांना जमिनीवर लोळविले. त्या युद्धात लक्षदत्त विजयी झाला. मोठ्या आनंदाने सर्व सैन्यासह तो नगराकडे परतला. लब्धदत्ताचा भीमपराक्रम पाहून देखील राजा त्याच्यावर प्रसन्न झाला नाही. अर्थात् दरिद्री लब्धदत्ताला राजाकडून काहीही द्रव्य मिळाले नाही. तो बिचारा पुन्हा राजद्वारातील आपल्या नेहमीच्या जागी जाऊन उभा राहिला.

अशा प्रकारे पाच वर्षांचा काळ निघून गेला. नंतर एके दिवशी दैवयोगाने राजाच्या मनात लब्धदत्ताबद्दल करुणा उत्पन्न झाली. तो स्वतःशी म्हणाला, 'आज एवढी वर्ष राजद्वारी उभा राहून तो दरिद्री जटाधारी हालअपेष्टा सहन करीत आहे. पण त्याला मी अद्याप काहीच द्रव्य दिले नाही. त्या माणसाच्या पापाची अखेर झाली असेल तर लक्ष्मी त्याच्यावर खचितच प्रसन्न होईल. त्याची परीक्षाच पाहू.' असा विचार करून राजा रत्नभांडारातन गेला. तेथील पुष्कळ अमूल्य रत्ने त्याने एका महाळुंगात भरली. नंतर महाळुंग घेऊन राजसभेत जाताच त्याने लब्धदत्तास बोलावून घेतले. त्याप्रमाणे तो राजसभेत आल्यावर राजाने त्याला एक चांगले सुभाषित म्हणण्यास सांगितले.

तेव्हा लब्धदत्ताने, नद्या, पाण्याने भरगच्च असलेल्या समुद्रालाच आपल्या पाण्याने भरत राहतात त्याप्रमाणे लक्ष्मी देखील धनवंतांनाच अधिक धन देत राहते, अशा अर्थाची एक आर्या म्हटली. ती राजाला खूप आवडली. तेव्हा संतुष्ट होऊन राजाने आपल्या हातातील रत्नांनी भरलेले महाळुंग लब्धदत्ताला दिले. ज्याच्यावर संतुष्ट होतील त्याचे जन्मदारिद्र्य घालविणाऱ्या महाराजांनी, जटाधाऱ्यावर संतुष्ट होऊन सुद्धा त्याला महाळुंगासारखी क्षुद्र वस्तू का दिली याचे राजसभेतील लोक आश्चर्य करू लागले. तो जटाधारीच दुर्दैवी असे त्यांना वाटले. बिचारा लब्धदत्तही मनात कष्टी झाला आणि ते फळ घेऊन राजद्वाराकडे गेला. तेवढ्यात एक भिक्षू तेथे आला. त्याने आपली भगवी छाटी लब्धदत्ताला विकून त्याच्याकडून ते सुंदर महाळुंग त्याने राजाला सप्रेम भेट म्हणून दिले. तेव्हा विस्मित झालेल्या राजाने त्याला विचारले, ' हे फळ तुला कुठं मिळालं ? ' तेव्हा त्या भिक्षूने फळ कसे मिळाले ते राजाला सांगितले. ते

ऐकून राजाला खेद वाटला. तो म्हणाला, 'अरेरे, अजून त्या बिचाऱ्याचं दुर्दैव संपलेलं दिसत नाही!'

लब्धदत्त पुन्हा राजद्वारी जाऊन उभा राहिला. भिक्षूकडून घेतलेली भगवी छाटी त्याने विकली. आणि मिळालेल्या पैशातून त्याने आपल्या भोजनाची व्यवस्था केली. दुसऱ्या दिवशी भरलेल्या राजसभेत राजाने लब्धदत्ताला अगत्याने बोलावून आपल्या सन्निध बसविले. त्याच्याकडून तीच आर्या पुन्हा वदवून घेतली. नंतर खूश होऊन राजाने तेच रत्नांनी भरलेले महाळुंग लब्धदत्ताला दिले. तेव्हा राजाच्या वागणुकीचे पुन्हा सर्व सभासदांना आश्चर्य वाटले. कष्टी झालेला लब्धदत्त हातात महाळुंग घेऊन राजद्वाराकडे निघाला. तेवढ्यात राजदर्शनाकरिता आलेला एक मांडलिक राजा तिथे आला. समोरून फळ घेऊन येणाऱ्या लब्धदत्ताला पाहून, राजदर्शनाकरिता हा चांगला शकून झाला असे त्या मांडलिक राजाला वाटले. म्हणून दोन वस्त्रांच्या मोबदल्यात त्याने ते महाळुंग लब्धदत्ताकडून घेतले. आणि राजसभेत जाऊन राजाला वंदन करून ते त्याच्यापुढे ठेवले. ते ओळखून राजाने प्रश्न केला, 'हे महाळुंग कुठं मिळाले?' तेव्हा मांडलिक राजाने त्याचा खुलासा केला. तेव्हा राजा खिन्न होऊन स्वतःशी म्हणाला, 'अरेरे, लक्ष्मी त्या गरिबावर अजूनही प्रसन्न होत नाही! माझा कृपाप्रसाद कधीही क्षुल्लक नसतो हे त्या हतभाग्याच्या लक्षात कसे येत नाही? मी दिलेली अमूल्य रत्नं पुन्हा माझ्याकडेच येतात, हा खरंच मोठा चमत्कार आहे!' तिकडे लब्धदत्ताने एक वस्त्र विकून एका दिवसाच्या जेवणाकरिता पुरेल एवढा शिधा विकत घेतला. आणि दुसरे वस्त्र फाडून त्याची नेसण्यासाठी दोन वस्त्रे केली.

तिसऱ्या दिवशी पुन्हा राजसभा भरली. राजाने पुन्हा मोठ्या आदराने लब्धदत्ताला बोलावून घेतले. त्याच्याकडून स्वतःस आवडलेली आर्या पुन्हा म्हणून घेतली. नंतर नेहमीप्रमाणे महाळुंग हाती घेऊन ते वरून लब्धदत्ताच्या हातात टाकले. पण त्या दिवशी लब्धदत्ताच्या सुदैवाने झाले काय की ते महाळुंग त्याच्या हातातून निसटून खाली पडले आणि ते फुटून त्याचे दोन भाग झाले. तेव्हा त्यातून बाहेर पडलेल्या अनेक अमूल्य रत्नांच्या झळाळीने राजसभेतील सभासदांचे डोळे दिपले. सर्वजण एकमुखाने म्हणाले, 'खऱ्या प्रकाराची जाणीव

न झाल्यामुळं आम्हाला महाराजांच्या वागण्यांचं संभ्रमित आश्चर्य वाटत होतं. महाराजांचा कृपाप्रसाद नेहमीच हा असा अमूल्यच असतो !' असे त्यांचे बोलणे ऐकून राजा म्हणाला, ' लब्धदत्तावर लक्ष्मी प्रसन्न होते का ते मी महाळुंगाची युक्ती योजून पाहात होतो. आज त्याचे पाप सरले आणि लक्ष्मी त्याच्यावर प्रसन्न झाली !'

नंतर प्रथम आश्चर्यचकित व नंतर अतिशय आनंदित झालेल्या लब्धदत्तास त्या उदार राजाने हत्ती, घोडे, सोने व अनेक गावे देऊन आपला मांडलिक राजा केले. लब्धदत्त एका क्षणात रंकाचा राव झाला.

अशा रीतीने राजद्वारी रात्रंदिवस उभा राहून राजाची एकनिष्ठ सेवा करणारा दरिद्री लब्धदत्त अतिशय धनवंत होऊन आपल्या घरी परत गेला.

# गर्वाचे घर खाली

कोणी एक मुनी एका नगराजवळ असलेल्या अरण्यातील एका पर्णकुटीत राहात होता. एकदा काय झाले, तो मुनी एका झाडाखाली बसला असताना त्या झाडावर बसलेल्या एका बगळीने त्यांच्या अंगावर विष्ठा टाकली. त्यामुळे त्या मुनीला फार राग आला. त्याने आपल्या जळजळीत नजरेने मान वर करून त्या बगळीकडे पाहिले. तोच ती मरून झाडाखाली टपकन् पडली. तेव्हा आपल्या दीर्घ तपस्येचे सार्थक झाले असे मुनीला वाटले. त्याला आपल्या तपाच्या सामर्थ्याचा मोठा गर्व झाला.

एकदा तो मुनी भिक्षा मागण्यासाठी नगरात गेला. वेळ दुपारची होती. एका ब्राह्मणाच्या दारी उभा राहून मुनीने भिक्षा मागितली. तेव्हा त्या घरची पतिव्रता स्वामिनी पुढे येऊन म्हणाली, 'महाराज, होमादि अग्निकार्यात गुंतलेल्या पतीची सेवा मी पूर्ण करून येते. तोपर्यंत भिक्षेसाठी कृपा करून थांबा!' असे त्या पतिव्रता स्त्रीचे बोलणे ऐकून त्या मुनीला राग आला. तो संतप्त नजरेने तिच्याकडे बघू लागला. तेव्हा ती स्त्री हसून शांतपणे म्हणाली, 'मुनिवर्य, एवढे रागावता कशाला ? शांत व्हा. मी काही बगळी नाही!' असे म्हणून ती घरात गेली. आणि तिच्या बोलण्याने कमालीचा आश्चर्यचकित झालेला मुनी दाराशीच उभा राहिला. तो स्वतःशी म्हणाला,'या बाईला बगळीची हकीकत कळली कशी ?'

थोड्या वेळाने पतिसेवा पूर्ण करून ती साध्वी हाती भिक्षा घेऊन बाहेर आली. तेव्हा मुनीने हात जोडून तिला नम्रपणे विचारले,'माते, बगळीची हकीकत मी कुणालाही सांगितली नाही. तेव्हा ती तुला कशी कळली, ते प्रथम मला सांग. नंतरच मी भिक्षेचा स्वीकार करीन!' तेव्हा ती पतिपरायण स्त्री म्हणाली,'महाराज, पतिसेवा हाच एकमेव माझा धर्म आहे. त्या योगेच मला असले सर्वज्ञतेचे अद्भुत ज्ञान लाभले आहे. या नगरात धर्मव्याध नावाचा एक

Raagmhave



शूद्र आहे. तो मांस विकतो. त्याची भेट घेऊन त्याला तू विचार. म्हणजे तुझं भलं होईल. तुझा गर्वही नाहीसा होईल !' याप्रमाणे आपल्या प्रश्नाला मिळालेले उत्तर व भिक्षा ही दोन्ही घेऊन तो मुनी चालता झाला.

नंतर दुसऱ्या दिवशी तो मुनी पुन्हा नगरात गेला. धर्मव्याधाचा तपास करीत अखेर तो जिथे मांस विक्री करीत बसला होता तिथे मुनी गेला. त्याला पाहाताच धर्मव्याध म्हणाला, 'त्या पतिव्रतेने तुला माझी भेट घेण्यास सांगितले आहे. होय ना ?' अशा धर्मव्याधाच्या प्रश्नाने आश्चर्यचकित झालेला मुनी म्हणाला, 'होय. पण तुला हे कसे समजले ? तू तर मांस विकणारा. तेव्हा तुला असली अद्भुत ज्ञानप्राप्ती कशानं झाली ?'

असे त्या मुनीचे शब्द ऐकून धर्मव्याध म्हणाला, 'महाराज, आईबापांची अविरत सेवा करणं हे माझं व्रत आहे. आई बाप माझी महान दैवतं आहेत. त्यांच्यावरील भक्तीमुळं मला असलं ज्ञान प्राप्त झालं आहे. फक्त चरितार्थासाठी मी दुसऱ्यांनी शिकार केलेल्या पशूंचे मांस विकतो. मला धनाचा लोभ नाही. ज्ञानप्राप्तीत मोठा अडथळा निर्माण करणारा जो अहंकार तो मला आणि त्या पतिव्रतेला नाही. म्हणूनच आम्हांला अशा प्रकारच्या ज्ञानाची प्राप्ती झाली.' एवढे सांगून आणि काही क्षण थांबून धर्मव्याध म्हणाला,'महाराज, तुम्हीही अहंकाराचा त्याग करून स्वधर्माप्रमाणे वागा !'

अशा धर्मव्याधाच्या सल्ल्याप्रमाणे मुनीने आपले आचरण ठेवले. आणि अखेर त्यालाही सिद्धी प्राप्त झाली.

पतिभक्ती आणि मातृपितृभक्ती यांचे असे महान सामर्थ्य आहे.

BVBK-0402976